रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २८१
www.ramprahar.com

◆ गुरुवार, ३० एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग


ॲल्युमिनियम प्लेट चोरणाऱ्या टोळीला केली अटक/२

पालीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट; नागरिक हैराण/५

रायगडच्या युवा खेळाडूंसाठी ब्रेबॉर्न स्टेडियमवर क्रिकेट/८

## पश्चिम बंगालमध्ये एक्झिट पोल भाजपच्या बाजूने

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचे मतदान संपले आहे.



पहिल्या टप्प्यात ९२ टक्क्यांपेक्षा जास्त आणि दुसऱ्या टप्प्यात ९० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले आहे. या पार्श्वभूमीवर एक्झिट पोलचे अंदाज येण्यास सुरुवात झाली आहे. प्रमुख संस्थांच्या एक्झिट पोलच्या अंदाजांनुसार पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १७८ ते २०८ जागा जिंकेल तर पोल डायरीच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १४२ ते १७१ जागांवर बाजी मारेल. मॅट्रिझच्या एक्झिट पोलनुसार भारतीय जनता पक्ष १४६ ते १६१ जागांवर विजयी होईल. चाणक्य स्टॅटेजीझच्या एक्झिट पोलने भाजप १५० ते १६० जागा जिंकेल असा अंदाज व्यक्त केला आहे.

# महाराष्ट्राचे एआय धोरण जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्राचे एआय धोरण जाहीर करण्यात आले आहे. लंडनमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापन करण्यात येणार आहे. तसेच हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या झालेल्या या बैठकीत इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, वन विभाग, ऊर्जा विभाग, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, महसूल विभाग, आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहे.

एआयच्या विश्वात महाराष्ट्राचे महत्वाकांक्षी पाऊल. महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण २०२६ जाहीर. राज्यात दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक आणि दीड लाख रोजगार संधीची निर्मिती. राज्यभरात एआयच्या संधीचे संतुलन साधण्यासाठी सहा एआय-उत्कृष्टता केंद्र स्थापन होणार.



याशिवाय पाच एआय इनोव्हेशन सिटीज ची स्थापना होणार. महाराष्ट्राचे एआय पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारे दमदार धोरण. (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग)

सामजिक समता व समरसता वर्षा निमित्त साता समुद्रापार महापुरूषांच्या विचारांचा जागर. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या प्रख्यात संस्थेत भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापनेचा महत्त्वपूर्ण निर्णय. कायमस्वरूपी अध्यासनाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉक्टरेटसाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार. (सामाजिक न्याय विभाग)

हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना. राज्यात तीनशे कोटी वृक्ष लागवडीकरिता

### ▌हरित आयोग स्थापन
### ▌लंडन येथे अध्यासन केंद्र; मंत्रिमंडळाचे सात मोठे निर्णय

महत्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम. पायाभूत सुविधा उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी आयोग काम करणार. (वन विभाग)

राज्यातील हरित ऊर्जेचा वापर आणि पारेषण क्षमतेचे अधिक बळकटीकरण. त्यासाठी मॅजेस्टिक महाराष्ट्र ॲक्सलरेटिंग ग्रीन एनर्जी अँण्ड स्टोरेज टेक्नॉलॉजीज इंटिग्रेशन इन कनेक्टेड ग्रीड योजना राबविण्यात येणार. योजनेसाठी जागतिक बँकेकडून कर्ज मिळणार. त्याबाबतचा प्राथमिक अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यास मंत्रिमंडळाची मान्यता. (ऊर्जा विभाग)

दिव्यांगाच्या शिक्षण भरारीला आणखी बळ. उच्च माध्यमिक परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मिळणार. गत बारा वर्षांनंतर पहिल्यांदाच भरीव वाढ. आता दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठ, परीक्षा बोर्ड, संस्थेला भरावे लागणारे शुल्क, प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, नोंदणी शुल्क, ग्रंथालय, नियतकालिकांसाठी, वैद्यकीय तपासणीचे शुल्क मिळणार. (दिव्यांग सक्षमीकरण विभाग)

रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे नाचणे येथे केंद्रीय विद्यालयाला जमीन. कोकणातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी आणखी एक महत्वाची सुविधा. केंद्र सरकारचे केंद्रीय विद्यालय संघटन, नवीन केंद्रीय विद्यालय उभारणार. मौजे नाचणे येथील अडीच हेक्टर जमीन उपलब्ध करून देणार. (महसूल विभाग)

आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना. आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थाद्वारा चालविल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १२ व २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतरची दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास मान्यता. (आदिवासी विकास विभाग)




# रायगडातील अंबा व कुंभे उदंचन जलविद्युत प्रकल्पाची क्षमता वाढणार

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'एनटीपीसी'शी सुधारित सामंजस्य करार

**मुंबई : प्रतिनिधी**

एनटीपीसी लिमिटेडच्या रायगड जिल्ह्यातील कुंभे व अंबा उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या स्थापित क्षमतावाढीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभाग आणि 'एनटीपीसी' यांच्यात सुधारित सामंजस्य करार करण्यात आला. या दोन्ही प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये १८०० मे.वॅ. वरून २६०० मे.वॅ. वाढ होणार आहे.

मंत्रालयातील समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा (विदर्भ, तापी आणि कोकण विकास पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, 'एनटीपीसी'चे विभागीय कार्यकारी संचालक (वेस्टन रिजन) ई सत्या फानी कुमार, महाप्रबंधक (हायड्रो) मनमीत बेदी, एनटीपीसीचे (हायड्रो इंजिनिअरिंग) सहायक महाप्रबंधक डॉ. अनुभव, हायड्रो इंजिनिअरिंगचे उप महाप्रबंधक डॉ. प्रशांत पांडे, डॉ. अरबिंद कुमार, अपर महाप्रबंधक सूर्य प्रकाश केसरवानी, अंबा पीएसपीचे सागर धांडे आदि उपस्थित होते.

जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. कपूर व एनटीपीसीचे विभागीय कार्यकारी संचालक श्री. ई. सत्या फानी कुमार यांनी सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी श्री. कपूर यांनी कराराची माहिती दिली.

सार्वजनिक खाजगी भागीदारीद्वारे (PPP) उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसन करण्याचे धोरण २० डिसेंबर २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. आतापर्यंत ५९ सामंजस्य करार झाले आहेत. एनटीपीसी बरोबरचा हा राज्याचा एकूण ६० वा सामंजस्य करार आहे. या धोरणास अनुसरून ६० सामंजस्य करारांद्वारे ८२,०१५ मे.वॅ. वीज निर्मिती क्षमता अपेक्षित असून याव्दारे रु. ४.२८ लक्ष कोटी इतकी गुंतवणूक तर १.३१ लक्ष मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार आहे.

एनटीपीसी लिमिटेड यांनी रायगड जिल्ह्यातील अंबा व कुंभे या उदंचन जलविद्युत प्रकल्पांचे सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतर प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेमध्ये ८०० मे.वॅ. ने वाढ होत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (CEA) मूळ सामंजस्य करारात सुधारणा करण्याची सूचना केली आहे. याअनुषंगाने एनटीपीसी लिमिटेड यांनी केलेली विनंती विचारात घेता मूळ सामंजस्य करारातील खालील नमूद उदंचन योजनांसाठी सुधारीत सामंजस्य करण्यात आला.

## बंगळुरूत रुग्णालयाची भिंत कोसळून सात जण ठार

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

कर्नाटकची राजधानी बंगळुरूमध्ये बुधवारी (दि.२९) झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठी दुर्घटना घडली. शिवाजीनगर परिसरातील बोअरिंग अँड लेडी कर्झन या सरकारी रुग्णालयाची कंपाऊंड भिंत कोसळून सात जणांचा जागीच मृत्यू झाला.

बंगळुरू शहराला बुधवारी संध्याकाळी अचानक सोसाट्याचा वारा आणि पावसाने झोडपले. या पावसापासून वाचण्यासाठी रस्त्यावरील काही विक्रेते आणि पादचाऱ्यांनी रुग्णालयाच्या जुन्या भिंतीचा आश्रय घेतला होता, मात्र वाऱ्याचा वेग जास्त असल्याने ही भिंत अचानक कोसळली आणि आश्रयाला उभे असलेले सर्व लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले. मृतांची माहिती मृतांमध्ये तीन लहान मुलांचा समावेश आहे.

हे सर्वजण भिंतीशेजारी उभे असताना हा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अन्य सात जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर त्याच रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



## उद्धव ठाकरे नाही, तर दानवेंना उमेदवारी

**मुंबई :** विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची अधिकृतपणे घोषणा होण्यास सुरुवात झाली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या जागी आता माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून विधान परिषदेसाठी उद्धव ठाकरेंचे नाव चर्चेत होते तसेच काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून त्यांनाच आग्रह केला जात होता, मात्र अंबादास दानवे ठाकरेंच्या पक्षाकडून विधान परिषदेवर जाणार असल्याची माहिती आदित्य ठाकरेंनी पत्रकार परिषदेत दिली.

## निवडक

### उष्णतेची लाट : पंढरपुरात उष्माघाताचा पहिला बळी


**सोलापूर :** राज्यात उष्णतेची लाट पसरली असून विदर्भात तापमान ४७ अंश सेल्सियसपर्यंत पोहचले होते, आता पंढरपुरातही उष्माघाताचा पहिला बळी गेला आहे. पंढरपुरातील एका २४ वर्षे तरुणाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा दावा त्याच्या कुटुंबीयांकडून करण्यात आला आहे. पंढरपूरमधील दिनेश प्रकाश देशमुख हा (२४) वर्षांचा तरुण ऊनातून घरी आल्यानंतर आजारी पडला. घरी दुपारी साडेतीन चार वाजता त्याला अस्वस्थ वाटू लागले आणि यातच त्याचा प्राण गेल्याची प्राथमिक माहिती आहे.

### दाभोलकर हत्याप्रकरणी आरोपीला जामीन मंजूर

**मुंबई :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष दिवंगत नरेंद्र दाभोलकर यांनी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी, सीबीआयच्या विशेष न्यायालयने दोन आरोपींना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्यामध्ये, सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना दोषी ठरवण्यात आलं. त्यापैकी, शरद कळसकरला मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आल्याने आता त्याची सुटका होणार आहे.

## भीषण अपघातामध्ये नववधूसह तिघांचा दुर्दैवी अंत

### ▪ वऱ्हाड घेऊन निघालेल्या कुटुंबाचा अपघात



**जळगाव : प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातुन एक भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. जळगाव जिल्ह्याच्या धरणगावमध्ये एक अतिशय हृदयद्रावक अपघाताची घटना घडली आहे. धरणगाव तालुक्यातील वराडखुर्दजवळ महामार्गावर टायर फुटल्याने भीषण कार अपघात झाला असून लग्नाहून परतणाऱ्या क्रूझर गाडीला टँकरवर धडक बसली, यात नववधूसह तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जण गंभीर जखमी झाले असून एका लहान मुलाची प्रकृती चिंताजनक आहे. आनंदाच्या क्षणावर अशाप्रकारे विरझन पडल्याने परिसरातून हळहळ व्यक्त आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातच्या वापी येथून लग्नाचं वऱ्हाड घेऊन अकोला येथे ही क्रूझर कार जात होती. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील वराडखुर्द जवळ महामार्गावर असतानाच या धावत्या क्रूझर कारचं टायर अचानक फुटलं आणि ही कार त्या रोडलगत उभ्या गॅस टँकरवर जाऊन धडकली. अतिशय भीषण अशी ही धडक होती. यामध्ये तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, जिचं नुकतंच लग्न झालं अशा नववधूचाही मृतांमध्ये समावेश असून त्यामुळे सगळेच हळहळले.

नववधूच्या हाताची मेहंदीही सुकली नव्हती, आता कुठे संसाराची स्वप्ने रंगू लागली होती आणि अशाप्रकारे अपघात नववधूचा दुर्दैवी अंत झाला. या अपघातात नववधू पूजा रवी वाघळकर, दत्तू भागवत, जगदीश वाघळकर अशी अपघातात मृत झालेल्यांची नावे असून तिघेही एकाच कुटुंबातील असल्याची माहिती समोर आली आहे. तर या अपघातात आणखी सहा जण जखमी असून लहान मुलाची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

## स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या १३व्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मातोश्री स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या तेराव्या पुण्यतिथीनिमित्त २८ व २९ एप्रिल रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

शिवाजीनगर येथील श्री बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये संगीत भजन, प्रवचन, **(पान २ वर..)**





**श्रीवर्धन : कडक उन्हाळ्यात समुद्रकिनारी पर्यटकांची संख्या रोडावली आहे. त्यामुळे स्थानिक व्यावसायिक चिंतेत आहेत.** (छाया : अमेय नाझरे)

## महाराष्ट्र दिनी प्रवाशांना भेट!
## मेमू रेल्वे होणार सुरू
### कोकणची अनेक वर्षांची मागणी पूर्ण



**माणगाव : प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या कडक तापमानात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी दिलासा देणारी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीचा विचार करत दिवा-चिपळूण या मार्गावर विशेष मेमू (MEMU) गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या आणि तेथून परतणाऱ्या हजारो प्रवाशांचा प्रवास आता अधिक सुलभ, जलद आणि आरामदायी होणार आहे.

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये कोकणात जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. आपल्या गावी, नातेवाईकांकडे किंवा निसर्गरम्य किनाऱ्यांकडे धाव घेणाऱ्या प्रवाशांना अनेकदा गर्दीचा सामना करावा लागतो. याच पार्श्वभूमीवर रेल्वेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, प्रवाशांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाची झळक दिसून येत आहे.

दिवा-चिपळूणदिवा मेमू या विशेष गाड्या १ मे २०२६ ते ७ जून २०२६ या कालावधीत धावणार आहेत. विशेष म्हणजे या गाड्या दर शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी सुरू राहणार असून, **(पान २ वर..)**

## देशात धावणार १०० टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वाढत्या पेट्रोलच्या किमती आणि परदेशातून होणारी कच्च्या तेलाची आयात कमी करण्यासाठी भारत सरकारने आता एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय मोटार वाहन नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी एक मसुदा अधिसूचना जारी केली आहे. याअंतर्गत आता देशात E८५ आणि E१०० यांसारख्या उच्च इथेनॉल मिश्रित इंधनांना अधिकृत मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

इथेनॉल हे ऊस, मका आणि खराब झालेल्या तांदळापासून तयार केलेले बायोफ्यूल आहे. E८५ या इंधनात ८५% इथेनॉल




आणि १५% पेट्रोलचे मिश्रण असते. तर E१०० हे पूर्णपणे शुद्ध बायोफ्यूल असून यात १००% इथेनॉलचा वापर केला जातो (०% पेट्रोल).

पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलची निर्मिती स्वस्त पडते. अंदाजानुसार, १००% इथेनॉल इंधन (E१००) प्रति लिटर ६० ते ७० रुपये दराने उपलब्ध होऊ शकते. यामुळे सर्वसामान्यांच्या इंधन खर्चात मोठी बचत होणार आहे. विशेष म्हणजे, यासाठी 'फ्लेक्स फ्युएल' इंजिन असलेल्या वाहनांचा वापर वाढवण्यावर सरकारचा भर आहे.

### आयात अवलंबित्व होणार कमी

भारताने २०२५ पर्यंत पेट्रोलमध्ये २०% इथेनॉल मिश्रणाचे (E२०) उद्दिष्ट यशस्वीपणे गाठले आहे. आता पश्चिम आशियातील तणाव आणि कच्च्या तेलाच्या अनिश्चित पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारला इंधनाच्या बाबतीत 'आत्मनिर्भर' व्हायचे आहे. या नवीन नियमांमुळे भारताच्या जैवइंधन कार्यक्रमाला मोठी गती मिळणार आहे.

# केंद्र शासनाच्या योजनांची रायगडात प्रभावी अंमलबजावणी करा -खासदार बारणे

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग रायगड जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची (दिशा) बैठक आज अलिबाग येथे खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली आणि खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत पार पडली. या सभेत केंद्र सरकारतर्फे राबवल्या जाणारया योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र शासनाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करा असे सांगितले अशा महत्वाच्या शासकीय सभांना गैरहजर राहणार या अधिकाऱ्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. सभांना दांडी मारणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात हक्कभंग आणण्याबाबत विचार सुरू असल्याचे खासदार तटकरे यांनी सांगितले.



आजच्या बैठकीत सहकार विभागाचा मुद्दा उपस्थित झाला असता त्यावर माहिती देण्यास जिल्हा उपनिबंधक उपस्थित नव्हते. यावरून खासदार सुनील तटकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेकदा महत्वाच्या सभांना सूचना देवूनही अधिकारी काहीतरी कारणे सांगून गैरहजर राहतात. संबंधित अधिकारयांना कुठल्याही परीस्थितीत हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले. बेजबाबदारपणे वागणारया अधिकारयांवर हककभंग आणण्याचा विचार व्हावा अशी सूचना सुनील तटकरे यांनइ केली.

कृषी विभागाच्या नाकर्तेपणावर आजच्या बैठकीत बोट ठेवण्यात आले. शेततळ्यांचे ९४ प्रस्ताव आले होते त्यापैकी केवळ १३ प्रस्ताव मंजूर झाले तर ८१ बाद ठरवण्यात आल्याची माहिती कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी दिली. यावर सभाध्यक्ष श्रीरंग बारणे, सुनील तटकरे यांनी नाराजी व्यकत केली. शेतकरयांच्या विविध योजनांची उद्दिष्टपूर्ती होत नाही. पीकविमा योजनेला देखील अल्प प्रतिसाद मिळतो आहे . शेतकरयांमध्ये जनजागृती करण्याबाबत कृषी विभाग कुचकामी ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. एकटया पेण तालुक्यातील ९० अंगणवाडयांचे सौरऊर्जा पॅनल वापरा अभावी वाया गेल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.

दरम्यान, पनवेल पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील यांनी यावेळी पळस्पे परिसरातील नदीपात्रात तेथील अरिहंत बिल्डर मॅरेथॉन, इंडिया बुल्सकडून सांडपाणी सोडले जाते. त्यामुळे पळस्पे गावातील नागरिकांना दुर्गंधीसह विविध आजारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन बंधाऱ्याला दरवाजे बांधावेत जेणेकरून पाण्याची साठवणूक होणार नाही. तसेच ज्या बिल्डर्सकडून नदीपात्रात सांडपाणी सोडले जाते अशांना नोटीसा पाठविण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे.

आजच्या बैठकीला जिल्हा परीषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे, जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, तालुका पंचायत समित्यांचे सभापती, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद विषय समिती सभापती उपस्थित होते.

# रसायनी पोलिसांनी ॲल्युमिनियम प्लेट चोरणाऱ्या टोळीला केली अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हिरानंदानी फॉर्च्यून सिटी येथील सोशल हाऊसिंग सोसायटीच्या बांधकाम साइटवरून सहा लाख तीस हजार रुपये किमतीच्या ॲल्युमिनियम सेंट्रिंग प्लेट चोरणाऱ्या दोन अट्टल चोरांना रसायनी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण व टायर्सच्या खुणांच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याचा छडा २४ तासांच्या आत लावला.



रसायनी घोसाळवाडी भोकरपाडा हद्दीतील हिरानंदानी फॉर्च्यून सिटी येथे टेम्पोमधून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी सहा लाख ३० हजार रुपये किमतीच्या ॲल्युमिनियम प्लेट्स लंपास केल्या होत्या. याप्रकरणी सिक्युरिटी सुपरवायझर सुरेश सिंह यांनी रसायनी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यानंतर पोलिसांनी मुंबई–पुणे महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने विश्लेषण केले.

तपासासाठी दोन तपास पथके तैनात करण्यात आली होती. पोलिसांनी सीबीडी बेलापूर परिसरातून विकास रामपाल वाल्मीकी (वय २६, रा. सीबीडी बेलापूर), आंताउल्ला ऊर्फ यासीन अमजअली खान (२५, रा. पळस्पे, पनवेल) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणात आणखी तीन आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे.रसायनी पोलिसांनी २४ तासांच्या आत आरोपींना जेरबंद करुन चोरीस गेलेला माल हस्तगत केला आहे.याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात कलम ३०३(२)३(५) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ विशाल नेहुल, पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव, पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर, सहाय्यक फौजदार बाळासाहेब कोळेकर, पोलिस नितिन शेडगे, गिरीष नगरकर, रविंद्र कुंभार, सचिन चौरे,हेमंत कोकाटे,सुशांक पिंगळे आदींनी कारवाई केली.

# अलिबाग-वडखळ मार्गाचे रूंदीकरण करणार -खासदार सुनील तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग – वडखळ मार्गाचे रूंदीकरण तसेच विरार – अलिबाग कॉरिडॉरच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाचा तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे आदेश संबंधित खात्यांच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत, अशी महिती रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांनी दिली.



बुधवारी (दि. २९) रायगड जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची (दिशा) आढावा बैठक अलिबाग येथील नियोजन भावनमध्ये आयोजित करण्यात आली होती. या आढवा बैठकीनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत खासदार सुनिल तटकरे यांनी ही माहिती दिली.

अलिबाग – विरार बहुउद्देशीय मार्गिका झाली तरी वडखळ अलिबाग मार्ग हा टप्पा राष्ट्रीय महामार्गाच्याच ताब्यात असणार आहे. या मार्गातील अलिबाग – वडखळ या टप्प्यातील रूंदीकरण करण्याबात आपण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी चर्चा केली आहे. त्याचा डीपीआर तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अलिबाग – विरार बहुउद्देशीय मार्गिकेच्या बळवली ते अलिबाग या दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे निर्देश नुकतेच मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे हे कामही लवकरच मार्गी लागेल. रायगड जिल्ह्यात जिल्हाधिकारी, एमएमआरडी, नैना, एमएसआरडी अशा यंत्रणा आहेत. या सर्व यंत्रणांचा समन्वयसाधून ही कामे केली जाणार आहेत, असे खासदर सुनिल तटकरे यांनी सांगितले.

मुबई – गोवा राष्ट्रीय माहामार्गाचे ९० टक्के काम पुर्ण झाले आहे. मुंबई गोवा महामार्गावरील इंदापूर व मागणगाव या दोन बाह्यवळण मार्गात कोकण रेल्वेचा अडथळा होता. पण तीन बैठका घेऊन मी तो दूर केला आहे. याबाबत कोकण रेल्वे, वनविभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकारणाच्या धिकाऱ्यांशी बैठक झाली. या कामतील तांत्रिक अडचणी दूर करण्याचे आदेश या धिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. लवकरच या दोन्ही बाह्यवळण मार्गाचे काम पूर्ण होईल, अशी महिती खासदार तटकरे यांनी दिली.

रायगड जिल्हा परिषदेमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजपा व शिवसेना महायुती सत्तेत आहे. जिल्हा परिषदेत काम करताना तीनही पक्षात समन्वय असावा यासाठी तसेच कामाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी काय कारावे लागेल यासाठी

## मुकुंद गावंड यांना पुरस्कार जाहीर

**उरण : वार्ताहर**



उरण तालुक्यातील पिरकोन गावातील समाज सेवक, मुकुंद बबन गावंड यांना एम.बी ए.एस .महासेवक दिव्यांग फौंडेशन यांच्या वतीने मुकुंद गावंड यांनी समाजा साठी केलेल्या कामाची नोंद घेवुन त्यांना संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे .पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

मुकुंद गावंड यांनी समाज सेवेचे व्रत त्यांनी हाती घेतलेले आहे. समाजातील गोर गरिबांची सेवा हीच ईश्वर सेवा समजून ते सर्व स्तरातील गरिबांना ते मदत करीत आहेत. याची नोंद दखल घेवूनच त्यांना पुरस्कारा साठी निवड करण्यात आली आहे.

# दुचाकी अपघातात कबड्डीपटूचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोलाड रोडवर झालेल्या भीषण अपघातात १७ वर्षीय अल्पवयीन मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मृत मुलगा हा एक होतकरू कबड्डीपटू असल्याने क्रीडा क्षेत्रातही शोककळा पसरली आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सुमारे रात्री २.१८ वाजण्याच्या सुमारास कोलाड–रोहा मार्गावरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ ही घटना घडली. आरोपीकडील पॅशन प्रो मोटारसायकल (क्र. एमएच–०६/एएक्स/१७९३) बेदरकारपणे व भरधाव वेगात चालवित असताना मागे बसलेला कु. अश्विन शंकर मिलगिरे (वय १७, रा. सदासंयोग कॉलनी, रोहा) याचा तोल जाऊन तो रस्त्यावर डोक्यावर पडला. या अपघातात त्याला गंभीर दुखापत झाली.

जखमी अवस्थेत त्याला तातडीने उपजिल्हा रुग्णालय, रोहा येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

कु. अश्विन मिलगिरे हा एक उत्कृष्ट कबड्डीपटू होता. स्थानिक तसेच वरच्या स्तरावरील कबड्डी संघांमधून त्याने आपल्या खेळाची चमक दाखवली होती. त्याच्या अचानक झालेल्या निधनामुळे क्रीडा वर्तुळात शोक व्यक्त केला जात असून, एक होतकरू खेळाडू गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

या प्रकरणी फिर्यादी नरेश नारायण मोरे (वय ५४, रा. रोहा) यांच्या तक्रारीवरून महेश कुमावत व अल्पवयीन चालक विजय महेश कुमावत (वय १७, रा. सदासंयोग कॉलनी, रोहा) यांच्याविरुद्ध गुन्हा र. नं. १०७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी अद्याप आरोपींना अटक केलेली नसून पुढील तपास सुरू आहे. पुढील तपास उपविभागीय अधिकारी प्रसाद बोकुले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलिस निरीक्षक मारुती पाटील यांच्या सूचनेनुसार तपासीय अंमलदार अतिशोष म्हात्रे करीत आहेत.

## चौक गावात जुन्या वादातून लोखंडी रॉडने मारहाण

### दोघांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**




चौक गावात जुन्या वादातुन लोखडी रॉडने मारहाण केल्या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

जुन्या भांडणाचा राग मनात धरून रुपेश मारुती गुंजाळ वय.३२ रा. नवीन वसाहत चौक, याला रवी रमेश गुंजाळ आणि अरुण लक्ष्मण शिंदे दोघे राहणार चौक यांनी लोखंडी रॉड आणि हाता बुयाने मारहाण केल्याने रुपेश गंभीर जबर जखमी झाला आहे.

रुपेश मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून घरी जात असताना रवी आणि अरुण याने त्याची दुचाकी अडवून त्याला खेचून खाली पाडला. रवी याने लोखंडी रॉडने रुपेश च्या तोंडावर हातावर उपट मारली तर अरुण याने हाता बुयाने मारहाण केली. रुपेश याची पत्नी भांडण सोडून आली असता तिला देखील दोघांनी शिवीगाळ करून बघून घेतो अशी धमकी दिली. जखमी रुपेश याने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे .पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मनोहर पाटील पुढील तपास करत आहेत.

# लातूर येथे फक्कड कादंबरीला राज्यस्तरीय पुरस्कार

**लातूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार लेखक सचिन अवघडे यांच्या "फक्कड" या कादंबरीला प्रदान करताना राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य महादेव गव्हाणे, अध्यक्ष प्राचार्य माधव गादीने, संयोजक प्रकाश घादगीने, कवी संजय जमदाडे ॲड.श्रीधर गायकवाड इत्यादी मान्यवरांच्या उपस्थित हा सोहळा पार पडला.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने दिला जाणारा मानाचा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी" पुरस्कार १४ एप्रिल२०२६ रोजी "फक्कड" कादंबरीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी लातूर या संस्थेच्या वतीने १४ एप्रिल २०२६ रोजी हा पुरस्कार जाहीर करण्यात आला होता.

विशेष म्हणजे "फक्कड" या कादंबरीने साहित्य चळवळीत उल्लेखनीय यश मिळवले आहे. साहित्यवेल सातारा यांनी प्रकाशित केलेल्या या कादंबरीला नुकताच कर्जत येथील अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने दिला जाणारा "साहित्य भूषण" पुरस्कारही प्राप्त झाला आणि त्या पाठोपाठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याने "फक्कड" कादंबरीची कीर्ती अधिक उंचावली आहे. ग्रामीण जीवनातील प्रश्न, सामाजिक विषमता आणि माणुसकीचा शोध या विषयांना स्पर्श करताना लेखकाने प्रभावी कथनशैलीचा वापर केला आहे. त्यामुळेच वाचकांसोबतच समीक्षकांनीही या कादंबरीची दखल घेतली आहे.

**फक्कड ही कादंबरी समाजातील वास्तव, संघर्ष आणि मानवी मूल्यांचा वेध घेणारी असून तिची मांडणी व शैली वाचकांच्या थेट मनाला भिडणारी आहे. त्यामुळेच या कादंबरीला वाचकांची मागणी असून अल्पावधीतच या कादंबरीला विविध नऊ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.**

**–सचिन अवघडे,** लेखक

## खासदार बारणे यांनी घेतली रेल्वे विभागीय व्यवस्थापकांची भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत मधील रेल्वे प्रवाशांना अनेक समस्या भेडसावत आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी मध्य रेल्वे विभागीय व्यवस्थापक हरेश मीना यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करून काही सूचना केल्या.

मात्र कोरोनाच्या पूर्वी थांबत असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना पुन्हा थांबा मिळावा. नवीन रेल्वे स्थानकाला जुने रेल्वे स्थानक कसे जोडता येईल. आरक्षण तिकीट कर्जतपासून मिळावे आदी समस्यांसाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांच्या समवेत मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक हरेश मीना यांची भेट घेतली.

यावेळी लोकल गाड्या नवीन स्थानकातून सुटणार असतील तर जुन्या रेल्वे स्थानकातील प्रवाशाना तेथे जाण्यासाठी किंवा तेथून येणाऱ्या प्रवाशांसाठी काय व्यवस्था करणार आहेत? असा प्रश्न बारणे यांनी उपस्थित केला. ही व्यवस्था स्थानक सुरु होण्यापूर्वी होणे गरजेचे आहे. अन्यथा पनवेल रेल्वे स्थानका सारखी परिस्थिती होईल. असे निदर्शनास आणून दिले. त्यावर मीना यांनी तेथील प्रत्यक्ष पाहणी करून पुढील व्यवस्था करण्यात येईल. असे सांगितले.

कर्जत स्थानकावर पहिल्या पासून डबल इंजिन लावण्यासाठी लांबपल्याचा गाड्या थांबतात. त्या अजूनही थांबतात. मात्र कर्जतच्या प्रवाशांना तेथून आरक्षण मिळत नसल्याने त्यांना कल्याण, लोणावळा येथून आरक्षण करावे लागते व त्या स्थानकांवर जाऊन गाडी पकडावी लागते. त्यामुळे हे मोठे त्रासदायक होते. कर्जत स्थानकापासून आरक्षण द्यावे. असे बारणे यांनी सूचित केले. त्यावर मीना यांनी तो प्रस्ताव टाकण्यात आला आहे.

त्यावर निर्णय झाल्यावर ते सुरु करण्यात येईल. असे सांगितले. लांब मात्र कोरोनाच्या पूर्वी थांबत असलेल्या लांब पल्ल्याच्या पुन्हा थंबवाव्यात यावर त्या गाड्यांच्या थांब्याबाबत आम्हाला अधिकार नाहीत. आम्ही तुमचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठवू. असे सांगितले.



**पान १ वरुन**

## स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या १३व्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

आरती, कीर्तन तसेच पुष्पवृष्टी यांचा समावेश होता. देवसागर साधक समाज, इंचगिरी संप्रदाय (शिवाजीनगर, गव्हाण, न्हावे, न्हावे खाडी, कोपर) तसेच ग्रामस्थ मंडळ शिवाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, उद्योजक भरत ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, चंद्रभागा घरत, नगरसेविका प्रतिभा भोईर, प्रकाश भगत, संजय भगत, अरुणशेठ ठाकूर यांच्यासह ठाकूर परिवारातील सदस्य व शिवाजीनगर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी भागुबाई ठाकूर यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या कार्याचे स्मरण केले.

## महाराष्ट्र दिनी प्रवाशांना भेट! मेमू रेल्वे होणार सुरू

एकूण ३६ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. दिवा ते चिपळूण गाडी रात्री ११:२५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ६:३० वाजता पोहोचेल, तर चिपळूण ते दिवा गाडी दुपारी ३:३० वाजता सुटून रात्री ११:१० वाजता पोहचेल.

या गाड्या निळजे, तळोजा पंचनंद, कळंबोली, पनवेल, सोमटणे, आपटा, जांभिवली, पेण, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे, वांगणी, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड आणि आंजनी अशा अनेक महत्त्वाच्या स्थानकांवर थांबणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

या उपक्रमामुळे केवळ प्रवास सोपा होणार नाही, तर अनेक कुटुंबांचे सुट्टीचे नियोजनही अधिक सुखकर होईल. गावी जाण्याची ओढ, आपुलकीची माणसं भेटण्याचा आनंद आणि कोकणच्या निसर्गाचा सान्निध्य या सगळ्यांचा अनुभव आता अधिक सहजपणे घेता येणार आहे.

## भानंग, अडनाळे भागातील कोकमाला मागणी



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील भानंग व अडनाळे विभाग हा कोकमाचे पिक घेण्यासाठी पुढे असून या भागातील डोंगराळ राहाटींमधे ही कोकमाची झाडे असून या कोकम बहरण्यास सुरवात झाली असून येथील कोकमाला बाजारात चांगली मागणी होत आहे.भानंग, अडनाळे तसेच तळेगाव, गायमुख,मालुक या भागातही कोकम चांगल्या प्रकारे होत आहेत.

या कोकमाचा आकार व कोकमातील रसाची चव ही वेगळीच असून या चवदार कोकमाला मागणी अधिक होत आहे.उन्हाळ्यात कोकम रस अधिक प्रमाणात तयार केले जाते.या रसामुळे उन्हाळ्यात आरोग्यास फायदा होतो,तसेच कोकम रस हे औषधी म्हणून वापरण्यात येतो.या भागात दहा वर्षापूर्वी प्रत्येक शेतकऱ्यांची चार ते पाच कोकमाची झाडे असायचीच चांगले उत्पन्न मिळत असे. मात्र आता या कोकमाच्या झाडांची संख्या कमी झाल्याचे पहावयास मिळत आहे.या भागात आजही शेतकऱ्यांनी कोकमाचे पिक काढल्यास त्यांतून चांगला अर्थिक लाभ मिळेल

# महाभीषण ‘एल निनो’चे संकट

## बळीराजासाठी कृषी विभागाचा सुरक्षा कवच आराखडा

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जागतिक हवामान बदलाचा फटका आता आपल्या उरणच्या किनारपट्टीला आणि डोंगर रांगांमधील शेतीला बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. प्रशांत महासागरातील 'एल निनो या उष्ण समुद्री प्रवाहाच्या सक्रियतेमुळे सन २०२६ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रासह रायगड जिल्ह्यातही पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, दिघोडे सजा येथील सहाय्यक कृषी अधिकारी विभावरी चव्हाण यांनी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि भविष्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मंत्रावर आधारित विशेष ॲक्शन प्लॅन जाहीर केला आहे.



एल निनो ही एक नैसर्गिक प्रक्रिया असली, तरी तिचा परिणाम मान्सूनच्या वाऱ्यावर होतो. यामुळे पाऊस लांबणीवर पडणे, पावसाच्या दोन नक्षत्रांमध्ये मोठा खंड पडणे आणि परतीचा पाऊस लवकर गायब होणे अशा समस्या उद्भवतात. विभावरी चव्हाण यांनी स्पष्ट केले की, उरण तालुक्यातील वेश्वी, दादरपाडा परिसरातील शेतकरी प्रामुख्याने भात शेतीवर अवलंबून आहे. जर पावसाने दगा दिला, तर जमिनीतील ओलावा लवकर संपतो, ज्यामुळे पिकांची वाढ खुंटते. तसेच, डोंगर भागातील पिकांना पाण्याची कमतरता भासून उत्पादनात घट होऊ शकते. म्हणूनच, 'पाऊस पडल्यावर नियोजन' करण्यापेक्षा 'पाऊस पडण्यापूर्वीच सज्ज' राहणे ही काळाची गरज आहे.

शेतकरी बंधूंनो, निसर्ग आपल्या हातात नाही, पण नियोजन आपल्या हातात आहे. एल निनोमुळे पावसाची ओढ लागण्याची शक्यता असली, तरी आपण जर 'मूलस्थानी जलसंधारण' आणि 'नाला उपचारांचा' अवलंब केला, तर आपण या संकटावर मात करू शकतो. कृषी विभाग तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.दुष्काळ टाळणे शक्य नाही, पण त्याची तीव्रता कमी करणे आपल्या हातात आहे. चला, या पावसाळ्यात पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवूया! याबाबतीत दिघोडे सजेतील गावामध्ये एल नीनो बाबत प्रसिद्धीचे प्रचार व प्रसिद्धी शिवार फेरीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात करण्यात आली असून या कामी आपल्याला श्रीमती. नमिता वाकडे बीटीएम आत्मा यांची मोलाची मदत मिळत आहे, शिवार फेरी मध्ये वेश्वी गावचे सरपंच अजित पाटील, मा.सरपंच विलास पाटील, संदेश कोळी मा.ग्रामपंचायत सदस्य , रविंद्र कासुकर दत्तात्रेय गोंधळी पोलीस पाटील यांच्या सह शेतकरी बांधवांनी सहभाग नोंदवला.

# महिलेची १८ तोळ्याची सोन्याची गंठण चोरणाऱ्या चोराला पकडले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हळदी समारंभात बसलेल्या ३५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १८ तोळे वजनाची सोन्याची गंठण चोरणाऱ्या चोराला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याच्याकडून १८ तोळे वजनाची सोन्याची गंठण ताब्यात घेण्यात आली. आरोपी रजनीस इंद्रपाल केवट (रा. वळवली गाव) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

कळंबोली, सेक्टर एक इ येथील सोनम अविनाश पाटील ह्या त्यांचे चुलत दीर चेतन हनुमंत पाटील (राहणार कळंबोली) यांच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी कुटुंबीयांसह रविवार २६ एप्रिल रोजी कळंबोली येथे गेल्या होत्या. रात्री जेवण झाल्यानंतर सोनम पाटील या मंडपामध्ये कुटुंबियांसोबत बसल्या होत्या. रात्री दहा ते साडेदहाच्या सुमारास आरोपी देखील त्यांच्या पाठीमागील बाजूला बसला होता. रात्री सव्वा दहाच्या सुमारास अचानक मंडपाच्या पाठीमागून येऊन आरोपी रजनीस इंद्रपाल केवट याने सोनम पाटील यांच्या गळ्यातील १८ तोळे वजनाचा सोन्याची गंठण खेचून तो पळून गेला.

यावेळी सोनम पाटील घाबरल्या आणि त्यांनी आरडाओरडा केला. आजूबाजूचे हळदी समारंभातील सर्व नागरिक आणि त्यांचे कुटुंबीय जमा झाले आणि काय झाले असे विचारले असता त्यांनी चोराने त्यांची १८ तोळ्याची गंठण पळवली असल्याचे सांगितले. यावेळी चोराचा शोध घेत गावातील सर्व नागरिक, कुटुंबीय चोराच्या पाठीमागे धावत गेले आणि त्याचा पाठलाग केला. यावेळी पळताना चोराला गावाच्या बाहेर निघता आले नाही. आणि तो पुन्हा पळता पळता मंडपात आला.

यावेळी आरोपी चोर रजनीस इंद्रपाल केवट याला नागरिकांनी पकडले. त्याला काहींनी चोप देखील दिला. त्याच्याकडे चोरलेल्या गंठणीची चौकशी केली असता त्याने त्याच्या जवळ नसल्याचे सांगितले. यावेळी त्याचे खिसे चेक केले असता खिशामध्ये १८ तोळे वजनाची सोन्याची गंठण सापडून आली. या प्रकाराची माहिती कळंबोली पोलिसांना दिल्यानंतर कळंबोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आरोपी रजनिस इंद्रपाल केवट याला ताब्यात घेतले.

## निवडक

### हेरॉईनप्रकरणी महिलेला अटक

**पनवेल :** हेरॉईन विक्री प्रकरणी कामोठे पोलिसांनी एका महिलेला अटक केली. तीच्या विरोधात २७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. २६ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास मानसरोवर रेल्वे स्टेशन रस्ता येथे एक महिला संशयित हेरॉईन अमली पदार्थ विक्री करत असताना सापडून आली. या महिलेने छापा दरम्यान तिचे नाव नितीना निळकंठराव भोसले असे खोटे सांगितले. आरोपी महिलेकडे अधिक चौकशी केले असता तिचे नाव अनिता संजीव पवार (वय ३२) असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.


### सोन्याच्या दुकानात चोरी

**पनवेल :** सोन्याच्या दुकानातून पन्नास हजार रुपये किमतीच्या दागिन्याची चोरी केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात २७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. शांतीलाल पटेल यांचा न्यू सावरिया ज्वेलर्स, आकाश हाईट, सेक्टर १०, तळोजा येथे सोन्याचे दुकान आहे. त्यांच्या दुकानात एक अनोळखी इसम आला आणि चांदीच्या पैंजण खरेदी करावयाच्या असे सांगून तीन चांदीचे पैंजणांचे जोड पसंत केले आणि ते बाजूला ठेवून मंगळसूत्राचे पेडल दाखवण्यास सांगितले. त्याला सोन्याच्या दागिन्याचा बॉक्स दाखवला असता त्यावेळी दुकानात आणखी एक गिऱ्हाईक आले आणि ते काउंटरवर गेल्याने त्या बॉक्समधून ५० हजार रुपये किमतीचा सोन्याचा दागिना नकळत अनोळखी इसमाने त्याच्या मोबाईलच्या खाली लपवून चोरी करून घेऊन गेला.

# कळंबोलीतील पाणी समस्येबाबत उपमहापौर प्रमिला पाटील यांच्याकडून पालिकेला निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली शहरात गेल्या ८ ते १० दिवसांपासून पाणीटंचाई निर्माण झाली असून, अपुऱ्या आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला रविनाथ पाटील यांनी मंगळवार २८ एप्रिल रोजी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची आणि खारघरच्या धर्तीवर कळंबोलीतही पालिकेमार्फत मोफत टँकर सुरू करण्याची मागणी केली आहे. यावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील उपस्थित होते.




कळंबोली शहराची दैनंदिन पाण्याची गरज सुमारे ३२ एमएलडी इतकी आहे, मात्र गेल्या काही दिवसांपासून शहराला कधी २० एमएलडी, कधी २१ एमएलडी तर काही वेळा केवळ १९ एमएलडी इतकाच पाणीपुरवठा होत आहे. आवश्यकतेपेक्षा निम्म्याने कमी पाणी मिळत असल्याने कलंबोलीतील अनेक सेक्टरमध्ये पाण्यासाठी हाहाकार उडाला आहे. पाणी नसल्यामुळे नागरिक आणि गृहनिर्माण सोसायट्यांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, अनेक सोसायट्यांना दरमहा ५ ते सात लाख रुपये केवळ पिण्याच्या पाण्यासाठी खर्च करावे लागत आहेत. पिण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी सामान्य नागरिकांना एवढा मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे ही खेदजनक बाब असल्याचे उपमहापौर यांनी म्हटले आहे. पाण्याच्या समस्येमुळे नागरिकांच्या आरोग्याचा आणि स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. उपमहापौरांच्या जनसंपर्क कार्यालयात नागरिकांच्या तक्रारींचा ओघ वाढला असून, लोकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. "हा विषय केवळ प्रशासकीय नसून थेट लोकांच्या दैनंदिन जगण्याशी संबंधित आहे," असे सांगत त्यांनी तातडीने तोडगा काढण्याची विनंती केली आहे.

कळंबोलीत अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा सुरळीत करावा, जोपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत खारघर शहराप्रमाणे कळंबोलीतही महानगरपालिकेमार्फत तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, नागरिकांना पाणी टंचाईपासून दिलासा मिळावा यासाठी आपत्कालीन पावले उचलली जावीत अशी प्रमुख मागणी उपमहापौर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# सेवा हक्क दिनानिमित्त पनवेल पालिकेचे कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क दिनानिमित्त २६ एप्रिल २०२६ रोजी पनवेल महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना ‘लोकसेवा हक्क अधिनियम’ आणि ‘माहितीचा अधिकार’ याबाबत माहिती मिळावी यासाठी विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजित करण्यात आले होते. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या प्रशिक्षणामध्ये प्राध्यापक डॉ. बापूराव बनसोडे यांनी माहिती दिली व त्यांच्या विविध प्रश्नांचे निरसन केले.

नागरिकांना अधिक कार्यक्षम, पारदर्शक व जलद सेवा देण्याच्या उद्देशाने पनवेल पालिकेकडून लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत एकूण ७० सेवा पुरविल्या जातात. ‘सेवा हक्क दिन’ पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने आपल्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे आणि नागरिकांना दर्जेदार सेवा पुरविणे या दृष्टीने विशेष प्रशिक्षण मंगळवारी दिले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिवहन उपायुक्त कैलास गावडे यांनी केले,तसेच कार्यक्रमाचे आभार उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले.

# जनगणनेच्या पार्श्वभूमीवर पनवेल तहसील कार्यालयामार्फत व्यापक तयारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या आगामी जनगणना २०२७ या राष्ट्रीय उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर पनवेल तहसील कार्यालयामार्फत व्यापक तयारी सुरू करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी रायगड माननीय किशन जावळे (भारतीय प्रशासकीय सेवा), उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, तहसीलदार पनवेल मीनल भोसले भामरे तसेच अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना २०२७ साठी नियोजनबद्ध कार्यवाही सुरू असून, सुमारे १८०० प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण पार पाडण्यात येत आहे.



या अनुषंगाने प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण २३ एप्रिल २०२६ ते ८ मे २०२६ या कालावधीत सिकेटी ज्युनिअर कॉलेज, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. पनवेल शहराची सुमारे सात लाख २९ हजार इतकी मोठी लोकसंख्या लक्षात घेता, जनगणनेचे कार्य प्रभावीपणे पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रशिक्षणामध्ये विविध शाळांतील शिक्षक तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश असून, त्यांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या दोन दिवसांत जनगणनेची सैद्धांतिक माहिती देण्यात येते, तर तिसऱ्या दिवशी क्षेत्रीय (फिल्ड) प्रशिक्षण दिले जाते. तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी १ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वगणना बाबत जागरूकता निर्माण करण्यात आली आहे.

यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत घरगुती गणना हा जनगणनेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे. पनवेल तहसील कार्यालयामार्फत या राष्ट्रीय कर्तव्यासाठी योग्य नियोजन, समन्वय व प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत असून, संपूर्ण यंत्रणा तत्परतेने कार्यरत आहे.

# लोकसेवा हक्क अधिनियमांची प्रभावी अंमलबजावणी

## करंजाडे ग्रामपंचायत रायगडात अव्वल | सरपंच मंगेश शेलार यांच्याकडून प्रशासनाचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना शासनाच्या अधिसूचित सेवा जसे की जन्माची नोंद, मृत्यूची नोंद आणि विवाह नोंदणी यांसारख्या सेवा कालमर्यादेत आणि पारदर्शकपणे उपलब्ध करून देण्यात करंजाडे ग्रामपंचायतीने बाजी मारली आहे. 'आपली सेवा आमचे कर्तव्य' या भावनेने प्रशासकीय सेवा दिल्याबद्दल रायगड जिल्ह्यात करंजाडे ग्रामपंचायतीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे.



जिल्हाधिकारी साहेबांच्या हस्ते हे मानाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले असून यामुळे ग्रामपंचायतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल बोलताना सरपंच मंगेश शेलार यांनी ग्रामपंचायत प्रशासनाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, प्रशासन जेव्हा नागरिकांच्या हितासाठी कटिबद्ध राहून काम करते, तेव्हाच अशा प्रकारचा बहुमान मिळतो. ग्रामपंचायत अधिकारी मनिषा जायभाये आणि ग्रामपंचायत कर्मचारी गौरी येरूणकर यांनी केलेल्या अथक परिश्रमामुळेच आज करंजाडे ग्रामपंचायतीचा नाव लौकिक संपूर्ण जिल्ह्यात झाला आहे.

ग्रामपंचायतीची संपूर्ण टीम आणि कर्मचारी याच सेवाभावी वृत्तीने नागरिकांसाठी काम करत आहेत. या यशाबद्दल सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे आणि सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामपंचायत अधिकारी मनिषा जायभाये आणि कर्मचारी गौरी येरूणकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. पारदर्शक कारभार आणि लोकाभिमुख सेवा यामुळे करंजाडे ग्रामपंचायतीने जिल्ह्यासमोर एक आदर्श निर्माण केला असून सर्व स्तरांतून या कामगिरीचे स्वागत होत आहे.

# पनवेलच्या ओरायन मॉलचा दहावा वर्धापन दिन

## 'शॉप अँड विन' अंतर्गत कार, बाईक जिंकण्याची संधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलकरांना मॉल संस्कृतीची ओळख करून देणारे आणि शहरातील रोजगार निर्मितीची महत्वाची भूमिका बजावलेल्या ओरायन मॉलने आपली १० गौरवशाली वर्षे पूर्ण केली आहेत. या निमित्ताने मॉल प्रशासनाच्या वतीने ग्राहकांसाठी शॉप अँड विन हा लकी ड्रॉ उपक्रम आयोजित केला आहे.

ओरायन मॉलच्या माध्यमातून दरवर्षी विविध उपक्रम राबवुन नागरिकांसाठी करमणुकीच्या दृष्टीने देखील व्यासपीठ उपलब्ध करून देतात. पनवेल येथे ३१ मार्च ते ३ मे या कालावधीत हा उपक्रम राबवला जात आहे. या अंतर्गत ग्राहकांना आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे प्रसिद्ध सिनिअभिनेत्री ऋतुजा बागवे यावेळी आयोजित लकी ड्रॉ साठी प्रमुख पाहुण्या म्हणुन उपस्थित राहणार आहेत. ओरायन मॉलमध्ये ५ हजार किंवा त्याहून अधिक रकमेची खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉ मध्ये



सहभागी होता येईल. एका बिलावर किमान ५ हजारांची खरेदी आवश्यक आहे.या लकी ड्रॉ मधील विजेत्यांना प्रथम बक्षीस मारुती सुझुकी वॅगनआर कार, द्वितीय बक्षीस जावा बाईक आणि तृतीय बक्षीस ४३ इंच स्मार्ट टीव्ही आदी बक्षिसे आहेत. पनवेलकरांच्या प्रेमामुळेच आम्ही १० वर्षांचा टप्पा पार करू शकलो. ग्राहकांचा हाच उत्साह कायम रहावा म्हणून शॉप अँड विन हा उपक्रम राबवत असल्याची माहिती ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर यांनी दिली.

# रामशेठ ठाकूर विद्यालयातील लिपिक संजय मेश्राम यांचा सेवापूर्ती गौरव

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात लिपिक या पदावर कार्यरत असलेले संजय पंढरीनाथ मेश्राम यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ मोठ्या उत्साहात झाला. संजय मेश्राम हे संस्थेच्या सेवेत सन १९९८ पासून कार्यरत होते.



या सोहळयाचे आयोजन रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कामर्स अ‍ॅण्ड सायन्स, खारघर या ठिकाणी करण्यात आलेले होते. सोहळ्याचे अध्यक्ष संस्थेचे सचिव गडदे सर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्या महेश्वरी झिरपे, प्राचार्या निशा नायर तसेच विशेष अतिथी माजी वरीष्ठ लिपिक नंदेश पाटील हे उपस्थित होते. स्वागत प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी केले.

संजय मेश्राम यांच्या कार्याचा गौरव करीत सोहळ्याचे अध्यक्ष गडदे सर यांनी त्यांचा व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा यथोचित असा सन्मान केला. मेश्राम सर यांनी संस्थेत एकूण २८ वर्षे प्रामाणिक सेवा केली म्हणून याची दखल घेत संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांना सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त २५००० रुपयांचा धनादेश देऊन त्यांच्या सेवेचा सन्मान केला.

सोहळा यशस्वी करण्यासाठी स्वप्नाली पवार, अभिजीत जोगदंडे, संभाजी जाधव यांनी योग्य नियोजन केले होते.

# धाकटा खांदाजवळ स्कूटरला अज्ञात वाहनाची धडक; तरुणाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुझुकी एक्सेस स्कूटरला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत झालेल्या अपघातात पारगाव येथील सुमित बळीराम तारेकर (वय ३५) याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी २८ एप्रिल रोजी कामोठे पोलीस ठाण्यात अनोळखी वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



सुमित बळीराम तारेकर (रा. पारगाव) हा त्याचा मित्र ओमकार कुबल याची सुझुकी एक्सेस स्कूटर (एमएच ४६ सीक्यू २२८६) यावरून २८ एप्रिल रोजी रात्री तीनच्या सुमारास कळंबोली सर्कलच्या दिशेने जात होता. टी पॉइंटकडून कळंबोली सर्कलकडे जाणाऱ्या हायवेवरील धाकटा खांदा गावाजवळील ब्रिज शेजारील लेनवर अज्ञात वाहन चालकाने त्याच्या स्कूटरला धडक दिली.

या झालेल्या अपघातात सुमित याच्या डोक्याला गंभीर दुखापती झाल्या आणि तो जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी कामोठे पोलिसांनी अनोळखी वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

## संपादकीय

# गाजराची पुंगी!

महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी वाजत तर नाहीच, पण मोडून खाण्याच्यादेखील योग्यतेची राहिलेली नसल्याने, आपल्या एकाकी राजकारणास नवी दिशा देण्याचा उद्धव ठाकरे यांचा प्रयत्न असावा...

**लोकसभा निवडणुकीतील विजयाचा अपवाद वगळता महाराष्ट्रात त्यानंतर झालेल्या सर्व निवडणुकांत सातत्याने पराभवाची धूळ चाखणाऱ्या महाविकास आघाडचे एकमेव आशास्थान असलेल्या उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेच्या निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेऊन योग्य तीच कृती केली आहे. शिवसेनेच्या उबाठा गटाचे नेते एवढेच आता त्यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थान राहिले आहे. शरद पवार यांच्या कृपेने मिळालेल्या मुख्यमंत्रीपदावरून पायउतार झाल्यानंतर, उद्धव ठाकरे यांचे सदस्यत्व केवळ सभागृहातील खुर्ची उबविण्यापुरतेच राहिले होते, हे त्यांच्या विधान परिषद कामकाजातील सहभागातून स्पष्ट झाले आहे. सभागृहात नाममात्र उपस्थिती, प्रश्नोत्तराच्या काळातील किंवा राज्यापुढील कोणत्याही महत्वाच्या प्रश्नावरील चर्चेत अभावानेच असलेला सहभाग आणि सरकारला धारेवर धरण्यासाठी वैधानिक आयुधांचा वापर करण्यातील उदासीनता असेच त्यांच्या कार्यकालाचे वर्णन करावे लागेल. अशा स्थितीत, पुन्हा विधान परिषदेत जाण्याचा विरोधी नेत्यांचा आग्रह त्यांच्या उदासीनतेवर उतारा ठरू शकला नाही. मुळातच, ठाकरे कुटुंबाने निवडणुकीच्या राजकारणापासून लांबच राहावे यासाठी खुद्द बाळासाहेब ठाकरे आग्रही होते. तरीही महाविकास आघाडीने थेट मुख्यमत्रीपदाच्या संधीचे दरवाजे खुले केल्याने त्यांनी मागच्या दाराने विधिमंडळात प्रवेश केला. थेट निवडणुकीतून जनतेचा स्पष्ट कौल घेऊन विजयाचे नगारे वाजवत विधिमंडळात दाखल होण्यातील आनंद काही वेगळाच असतो. ठाकरे यांच्या पाठीशी बाळासाहेबांची पुण्याई असतानाही, त्यांनी मतदारांचा कौल घेऊन विधानसभेत दाखल होण्याऐवजी विधान परिषदेत बिनविरोध निवडून जाण्याची संधी साधली. नोव्हेंबर २०१९ मध्ये मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर कोणत्याही सभागृहांचे सदस्य नसल्याने विधान परिषदेचा मार्ग निवडून मे २०२० मध्ये ते विधिमंडळाचे सदस्य झाले. शिवसेनेतील बंडानंतर मुख्यमंत्रीपद सोडण्याची वेळ आली तेव्हाच त्यांनी विधान परिषद सदस्यत्व सोडण्याचेही त्यांनी स्पष्टपणे जाहीर केले होते. मात्र, स्वमुखाने केलेल्या घोषणेचा त्यांना कालांतराने विसर पडला आणि आमदारकीची वस्त्रे सांभाळत ते सत्तेच्या राजकारणात रमले. पण, राज्याच्या हितासाठी आपल्या सदस्यत्वाच्या माध्यमातून सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम ते करतील अशी जनतेची अपेक्षा मात्र ते पूर्ण करू शकले नाहीत. त्यामुळे, विधिमंडळातील त्यांची कामगिरी यथातथा ठरलीच, पण निवडणुकीच्या राजकारणातही त्यांच्या नेतृत्वाचा महाविकास आघाडीस फारसा फायदा झालाच नाही. उद्धव ठाकरे यांच्या गटासही गळती लागत गेल्याने, केवळ उरलासुरला पक्ष टिकविण्याचेच आव्हान त्यांच्यासमोर उभे राहिले होते. अशा परिस्थितीत, पुन्हा एकदा, केवळ महाविकास आघाडीच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिल्यामुळे विधान परिषदेच्या खुर्चीला चिकटून राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला असता, तर मात्र, खुर्चीचा मोह ते टाळू शकत नाहीत, असा संदेश उर्वरित संघटनेत गेला असता. संघटना टिकवावी की आमदारकी टिकवावी असा निर्णायक क्षण जेव्हा येतो, तेव्हा संघटना टिकविण्याचाच निर्णय त्यांनी घेतलेला दिसतो. या निर्णयानंतर आता उलटसुलट तर्कवितर्क लढविले जातील. ठाकरेंना महाविकास आघडीची गरज संपल्याचेही बोलले जाईल. भाजपसोबत छुपा समझोता केल्याची चर्चा तर सुरू झालीच आहे. तरीही, पुन्हा एकदा बाळासाहेबांच्या भूमिकेचे अनुकरण करून प्रतिमा सावरण्याचा प्रयत्न म्हणून त्यांच्या या निर्णयाचे पक्षातूनही स्वागत होईल यात शंका नाही.**

# पोलादपुरात विंधनविहिरीत जलपुनर्भरण करण्याची गरज



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात बोअरवेलचे प्रमाण गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने वाढत असताना जिल्ह्यातील सर्वाधिक भुजलाचे दुषित नमूने तालुक्यामध्ये आढळून आले आहेत. दहा वर्षांपूर्वी पुणे येथील रासायनिक पृथःकरण प्रयोगशाळेने ग्रामीण रूग्णालयाबाहेर केलेल्या उत्खननादरम्यान तालुक्यातील भुजलाचा अहवाल गोपनीय अहवाल सादर केला होता. मात्र, त्याकडे दूर्लक्ष करून पाणीटंचाई निवारणाच्या राजकीय प्रतिष्ठेपोटी बोअरवेलची संख्या वाढत गेली असल्याने ही दूषित पाणी नमून्यांची परिस्थिती निर्माण झाली असल्याचे मत काही आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, तालुक्यातील जलजीवन मिशनअंतर्गत ५७ नळपाणीपुरवठा योजनांचे काम २२ ठेकेदारांमार्फत ५३ कोटी रूपयांची तरतूद खर्ची होऊन अधिकच्या प्रस्तावित आणि विस्तारीत पाणीयोजनांच्या पूर्ततेनंतरही पाणीटंचाईची तीव्रता कायम राहणार असल्याने डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पोलादपूर तालुक्यामध्ये विविध जलसंधारणाची कामे तसेच विहिरी व विंधनविहिरीत जलपुनर्भरण करण्याची कामे लोकसहभागातून केली जात असल्याने टंचाई आराखडयातून टंचाईग्रस्त गावांची संख्या कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्याच्या पाणीटंचाई उपाय योजना कृती आराखडयामध्ये पोलादपूर पंचायत समितीमार्फत २०१०-११ मध्ये तीनवेळा बोअरवेल आराखडा प्रस्तावित करण्यात आला. पहिल्या आराखडयात १ जानेवारी ते ३१ मार्च २०१० दरम्यान १५ गांवे आणि ६१ वाडयांचा समावेश या बोअरवेल प्रोग्राममध्ये करण्यात आला. १ एप्रिल ते ३० जून २०१० च्या बोअरवेल प्रोग्राममध्ये ८ गावांचा १३ वाडयांचा समावेश करण्यात आला. १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०११ या कालावधीतील पाणीटंचाई निवारण कृती आराखडयामध्ये ४२ गांवे आणि १७२ वाडयांमध्ये अशा एकूण २१४ ठिकाणी बोअरवेलची उपाययोजना करण्यासाठी प्रस्ताव करण्यात आला. याच पाणीटंचाई निवारण कृती आराखडयामध्ये १ जानेवारी ते ३१ मार्च २०१२ मध्ये ४ गांवे आणि २२ वाडया अशा एकूण २६ ठिकाणी बोअरवेल खणण्याचा प्रस्ताव करण्यात आला. या पाणीटंचाई निवारण कृती आराखडयामध्ये ३१ डिसेंबरपर्यंतची बोअरवेलची प्रस्तावित मागणी आणि ३१ मार्च २०१२ पर्यंत बोअरवेलची प्रस्तावित मागणी पाहता आता प्रत्यक्ष आराखडयात तातडीने मंजूरी होऊ शकेल, अशी संख्या केवळ २६ बोअरवेलची असल्याने यामध्ये ४० बोअरवेलची विशेष अत्यावश्यक बाब म्हणून मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी आणि जिल्हा पाणीटंचाई निवारण कृती समितीकडे सादर करण्यात आला.यामुळे तालुक्यात प्रचंड प्रमाणात भुजल उपशासाठी बोअरवेल करण्यात आल्याचे निष्पन्न होत असून पुणे येथील रासायनिक पृथःकरण प्रयोगशाळेच्या गोपनीय अहवालाकडे यामुळे दूर्लक्ष झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याखेरिज, नळपाणीपुरवठा योजनांच्या साठवण टाक्यांना झाकणे बसविली नसणे, पाणीपुरवठयाचे स्त्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न नसणे, नळयोजनेच्या पाईपलाईनची गटार व अन्य भागातून जोडणी, गंजलेले पाईप अशा अनेक बाबी पेयजलाचे नमूने दूषित असण्यास कारणीभूत ठरले आहेत.

रायगड जिल्ह्यातील जिल्हा प्रयोगशाळा अलिबागकडून पोलादपूर तालुक्यातील ऑक्टोबर २०१२ मध्ये पाठविण्यात आलेले ३७ दूषित पाण्यांचे नमूने तपासून आले असता त्यापैकी १३ पाणी नमून्यांचा अहवाल पिण्यास योग्य असा प्राप्त झाला.ऑक्टोबर २०१२ मध्ये आडावळे बुद्रकु बौध्दवाडी हातपंप, कापडे बुद्रुक भराववाडी हातपंप व भवानवाडी हातपंप, देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीत हळदुळे येथील बोअरवेल, देवळे येथील नळपाणी योजना, देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीत दाभिळ येथील नळयोजना, बोरावळे येथील गुडेकरकोंड येथील झऱ्याच्या पाण्याचा स्त्रोत, भोगावखुर्द येलंगेवाडीतील साठवण तलाव, कोतवाल खुर्द येथील सार्वजनिक नळ, देवपूर ग्रामपंचायत हद्दीतील गांजवणे येथील सार्वजनिक नळ, वझरवाडी येथील सुरबाचीवाडी साठवण टाकी, सडवली ग्रामपंचायत हद्दीतील चोळई नळपाणीपुरवठा योजना आणि चोळई येथीलच दुसरी नळपाणीपुरवठा योजनांचे पाणी दूषित असल्याचा अहवाल जिल्हा प्रयोगशाळेकडून प्राप्त झाला असून दूषित पाण्याच्या नमून्यांचे प्रमाण ३५ टक्के असल्याचे दिसून आले आहे.

जिल्हा आरोग्य यंत्रणेने केवळ दूषित पाण्यामुळे पसरणारे साथीचे आजार पोलादपूर तालुक्यात दिसून येत नसल्याचे समाधान न मानता फ्लोराईडस् व अन्य घातक क्षारयुक्त पाणी पिण्याने तालुक्यातील जनजीवनावर होणारे दूरगामी घातक दुष्परिणाम लक्षात घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

'आधी टंचाई आराखडा; त्यानंतर नेमेचि येता मग पावसाळा' अशी परिस्थिती दिसून येत आहे. लाखो रुपये या टंचाई आराखडयावर खर्च झाला तरी कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने टंचाईग्रस्त गावाची नावे आरखडयामध्ये वाढत आहेत. यंदाच्या टंचाई आराखडयामध्ये सार्वजनिक विहिरी खोल करणे किंवा गाळ काढण्यासाठी २१ गाव व ३२ वाडयांच्या प्रस्तावावर ७९.५० लाख खर्च अपेक्षित आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ४४ गाव ८१ वाड्यांच्या प्रस्तावावर ३७.५० लाख खर्च अपेक्षित आहे. विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती ०६ गावातील १४ वाडयांसाठी ७ लाख तर विंधन विहिर कामासाठी १३ गावातील ३२ वाडयांचा समावेश आहे. यासाठी ४६ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. खासगी विहीर अधिग्रहण करणे १ गावातील अंदाजे १ लाख खर्च असे ८५ गाव १५९ वाडयांसाठी २४४ उपाययोजनांचा आराखडयामध्ये समावेश करण्यात आला आहे याकामी १७१ लाख खर्च अंदाजित आहे. पोलादपूर तालुक्यात पाणी टंचाई काळात पाणी टंचाईकृती आराखडयामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी २२ गावे २२ वाडयांना एप्रिलपासून मागणी आल्यास टँकरने पाणीपुरवठा मंजुरीनंतर करण्यात येणार आहे.

पोलादपूर तालुक्यातील जलजीवन मिशनअंतर्गत ५७ नळपाणीपुरवठा योजनांचे काम २२ ठेकेदारांमार्फत ५३ कोटी रूपयांची तरतूद खर्ची होऊन ही ज्या ५७ नळपाणीपुरवठा योजनांवर खर्च झाला; त्या गावांमध्येही मागील वर्षीपासून पाणीटंचाईने उग्र रूप धारण केल्याने जलजीवन योजनेचा फोलपणा उघड झाला आहे.

पोलादपूर तालुक्याच्या गेल्यावर्षीच्या २०२२ सालाच्या पाणीटंचाई निवारण आराखडयामध्ये भुजल उपसा करण्याकामी १३ गांवे आणि ५५ वाडयांमध्ये अशा ६८ ठिकाणी सुमारे ४० लाख ८० हजार रूपयांची विंधनविहिरी घेण्याची मागणी समाविष्ट करण्यात आली आहे. आतापर्यंत विंधनविहिरी दुरूस्ती आणि विंधनविहिरी घेण्याच्या उपाययोजनांमुळे पोलादपूर तालुक्यात भुमातेला हजारो छिद्र पाडून दररोज लाखो लिटर्स पाण्याचा उपसा केला जात असून भुजलाचा पाण्याचा साठा मोठया प्रमाणात घटत आहे. एकीकडे, जमिनीवरील पाण्याचा साठा संपुष्टात येत असताना भुजलाच्या पाण्याचे प्रदुषण व मोठया प्रमाणात उपसा या बाबींकडे आता फारकाळ दूर्लक्ष करून चालणार नाही.

भूगर्भातील पाणी उपसून झाल्यानंतर पुन्हा धरणी मातेचे पाण्याचे ऋण फेडण्यासाठी जलपुनर्भरण करण्याची निरुपणकार डॉ.अप्पासाहेब धर्माधिकारी यांची संकल्पना ग्रामीण भागातही युध्दपातळीवर राबवली असून दरवर्षी पावसाळयामध्ये विंधनविहिरींमध्ये छपरावरून वाहून जाणारे पाणी पुन्हा भरल्यास बारमाही जलस्रोत खुला राहू शकतो. प्रत्येक पंचायत समितीने वनराई बंधाऱ्यांचे उद्दिष्ट ओलांडून मोठया प्रमाणात जलसाठा उपलब्ध झाल्याने २०१४-२२ दरम्यान टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी तीन आठवडे उशिरा मागणी झाली हे बंधाऱ्यांचे यश आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### इलेक्ट्रिक स्कूटरची बॅटरी खराब झाल्यास मिळतात संकेत

सध्या भारतात दर महिन्याला मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक स्कूटर खरेदी केल्या जात आहेत. अलिकडे सर्वत्र इलेट्रिक बाईकचा वापर वाढू लागला आहे. ग्राहकांची पसंती या वाहनाला मिळत असल्याचे दिसून येत आहे, परंतु काही लोकांच्या निष्काळजीपणामुळे स्कूटरची बॅटरी खराब होते. बॅटरी खराब झाल्यावर कोणते संकेत मिळतात हे



**जाणून घेऊया...**

सामान्यपेक्षा वेगळा आवाज : जर इलेक्ट्रिक स्कूटर चालवताना नेहमीपेक्षा वेगळा आवाज येत असेल, तर ते स्कूटरच्या बॅटरीमध्ये समस्या असल्याचे लक्षण असू शकते. कधीकधी अंतर्गत शॉर्ट सर्किटचा धोका असतो आणि कधीकधी बॅटरी जास्त गरम होते तेव्हा नेहमीपेक्षा वेगळा आवाज येतो.

मंद प्रकाश : स्कूटर चालवताना दिव्यांची चमक लक्षणीयरीत्या कमी झाल्यास किंवा बॅटरी क्षमतेनुसार चार्ज होत नसेल तर बॅटरीचे आयुष्य संपत आले आहे समजावे. तुमच्या इलेक्ट्रिक स्कूटरला वरीलपैकी कोणतीही लक्षणे जाणवत असल्यास लगेच बॅटरी बदलावी.


स्कूटर लवकर सुरू न होणे : इलेक्ट्रिक स्कूटर सुरू करण्यात अडचण येत असेल किंवा सुरू व्हायला खूप वेळ लागत असेल, तर स्कूटरच्या बॅटरीमध्ये काही समस्या असू शकते. बॅटरीचे आयुष्य संपल्यामुळे स्कूटर लवकर सुरू होत नाही.

बॅटरी लीक होणे : अनेक वेळा जेव्हा स्कूटरची बॅटरी खराब होते तेव्हा ती एकतर फुगते किंवा लीक होते. अशा दोन्ही परिस्थितीमध्ये स्कूटर आणि प्रवासी धोक्यात येऊ शकतात. कारण अशा स्थितीत बॅटरीचा स्फोट होण्याचा धोका जास्त असतो. असे झाल्यास गंभीर दुखापतही होऊ शकते.

स्कूटर सारखी थांबणे : अनेक वेळा स्कूटर थोड्या अंतरावर जाऊन थांबत असेल तर बॅटरीचे आयुष्य संपले आहे समजावे. तसेच चार्जिंग करून देखील असा त्रास होत असेल तर इलेक्ट्रिक स्कूटरची बॅटरी बदलावी.

(टीप : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. अधिक तपशीलांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.)

# भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके



**निमित्त**

धुंडिराज गोविंद फाळके ऊर्फ दादासाहेब फाळके हे चित्रपटनिर्मिती करणारे महाराष्ट्रातील व भारतातील पहिली व्यक्ती होते आणि यासाठीच त्यांना भारतीय चित्रपटांचा जनक मानले जाते. १९१३ साली त्यांनी निर्माण केलेला राजा हरिश्चंद्र हा मूक चित्रपट मराठी व भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील आद्य चित्रपट होय. १९३७पर्यंतच्या आपल्या १९ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी ९५ चित्रपटांची व २६ लघुपटांची निर्मिती केली. भारतीय अभिनेत्यांना त्यांच्या जन्मभरच्या चित्रपटविषयक योगदानाबद्दल भारतीय चित्रसृष्टीतील दादासाहेब फाळके पुरस्कार हा सर्वांत मोठा पुरस्कार दिला जातो. आज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा...

दादासाहेब फाळके यांचा जन्म नाशिकमधील त्र्यंबकेश्वर येथे झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध संस्कृत तज्ज्ञ होते. इ.स. १८८५ साली त्यांनी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे प्रवेश घेतला. १८९० साली 'जे.जे.'तून उत्तीर्ण झाल्यावर ते कला भवन, बडोदा येथे शिल्पकला, तंत्रज्ञान, रेखाटन, चित्रकला, छायाचित्रणकला इत्यादी गोष्टी शिकले. त्यांनी गोध्रा येथे छायाचित्रकार म्हणून व्यवसाय सुरू केला, परंतु प्लेगच्या उद्रेकात त्यांची प्रथम पत्नी आणि मूल दगावल्यावर त्यांना ते गाव सोडावे लागले. लवकरच त्यांची ल्युमिएर बंधूंनी नेमलेल्या ४० जादूगारांपैकी एकाशी, जर्मन कार्ल हट्‌र्झ याच्याशी ओळख झाली. त्यानंतर त्यांना भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण संस्थेसाठी ड्राफ्ट्समन म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या धडपड्या स्वभावामुळे लवकरच ते नोकरीच्या बंधनांना कंटाळले व त्यांनी छपाईचा व्यवसाय सुरू केला. शिळाप्रेस छपाईच्या तंत्रात ते वाकबगार होते. त्यांनी राजा रविवर्मांसोबत काम केले. पुढे स्वतःचा छापखाना काढला तसेच छपाईची नवी तंत्रे आणि यंत्रे अभ्यासायला जर्मनीची वारी केली. पुढे लाईफ ऑफ ख्रिस्त हा मूकपट पाहिल्यानंतर त्यांनी आपले लक्ष हलत्या चित्रांच्या व्यवसायाकडे वळवले व १९१२ साली त्यांनी राजा हरिश्चंद्र हा पहिला मूकपट काढला. तो ३ मे १९१३ या दिवशी मुंबईच्या कॉरोनेशन चित्रपटगृहात प्रेक्षकांना पहिल्यांदा दाखवण्यात आला.

सरस्वतीबाई या दादासाहेब फाळके यांच्या पत्नी. दादासाहेबांचा पहिला चित्रपट बनवण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता. चित्रपटाच्या निर्मितीखर्चासाठी सरस्वतीबाईंनी आपले सोन्याचे दागिने विकले. त्या फिल्म डेव्हलपिंग, मिक्सिंग आणि फिल्मवर रसायनांचा उपयोग शिकल्या.

भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनावरही असाच चित्रपट बनवायचा ध्यास घेऊन अथक प्रयत्नांनी त्यांनी लंडनला जाऊन चित्रपटविषयक तांत्रिक ज्ञान मिळवले. तेथून परतल्यानंतर मुंबई (दादर) येथे फाळके चित्रपटनिर्मितिगृहाची स्थापना केली आणि सहा महिन्यात मुंबईच्या कोरोनेशन चित्रपटगृहामध्ये त्यांनी निर्मिलेला राजा हरिश्चंद्र हा पहिला भारतीय बनावटीचा मराठी पूर्ण बोलपट प्रदर्शित झाला. या चित्रपटांनंतर त्यांनी मोहिनी भस्मासूर (१९१३), सत्यवान सावित्री (१९१४) या चित्रपटांची निर्मिती केली. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### जेवणाची योग्य वेळ कशी ठरवायची?

सकाळी लवकर शाळेत जायचं म्हणून, तर ऑफिसला जाण्यासाठी लवकर उठायचं म्हणून आपल्यातील बरेच जण रोजच्या ठरलेल्या वेळेतच रात्रीचं जेवण करतात. काही जण ९, १० तर काही जण अगदी ११ वाजतासुद्धा जेवतात; तर काही जण भूक लागल्यावर जेवायला घेतात. अलिकडेच हृदयरोगतज्ज्ञ आणि लेखक, डॉक्टर बेल्ले मोनाप्पा हेगडे यांनी काटेकोर वेळापत्रकानुसार खाणे हा आपल्या आरोग्यासाठी सर्वोत्तम मार्ग असू शकत नाही, असे स्पष्ट केले आहे. या विषयाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी व आहाराच्या या संकल्पनेचा अवलंब करताना आहारतज्ज्ञ आणि मधुमेह शिक्षक कनिक्का मल्होत्रा यांच्याशी चर्चा केली. त्या वेळी डॉक्टर म्हणाल्या की, आहाराचा समतोल राखण्याची एखादी वेळ ठरवा, असा सल्ला त्यांनी दिला आहे.



वेळापत्रकानुसार जेवणे : मधुमेह किंवा पूर्व मधुमेह असलेल्यांसाठी रक्तातील साखरेचे नियमन करू शकते. पचनास प्राधान्य देऊ शकते. ज्यामुळे अन्न प्रक्रिया सुरळीत होते. याची नकारात्मक बाजू पाहता ठरलेल्या वेळेत अन्नाचे सेवन केल्याने भुकेकडे दुर्लक्ष होते, यामुळे ठरवलेल्या वेळेत जास्त खाणे, चयापचय बिघडवणे आणि संभाव्यतः पचनास त्रास होऊ शकतो. भूक लागल्यावर अन्नाचे सेवन करणे : आपल्या शरीराच्या नैसर्गिक संकेतांना प्रतिसाद देतो. पचनक्रिया आणि पोषक घटकांचे शोषण, मदत आणि चयापचय क्रियादेखील सुधारते. याची नकारात्मक बाजू पाहता व्यस्त शेड्यूलमुळे जेवण टाळल्यास नंतर जास्त प्रमाणात खाल्लं जातं आणि रक्तातील साखरेची पातळी विस्कळीत होऊ शकते.

जेवण व वजन व्यवस्थापन : खाण्याचे निश्चित वेळापत्रक असल्याने अति खाणे टाळता येते. यामुळे वजन कमी करण्यासही मदत होते तसेच वेगवेगळ्या शरीराच्या हालचाल किंवा चलनवलन स्तरावर आधारित आहाराचे सेवन करू शकता. ॲक्टिव्ह दिवसांमध्ये कमी खाऊ शकता किंवा विश्रांतीच्या दिवसांत जास्त खाऊ शकता. या वेळी कठोर वेळापत्रक आधुनिक जीवनशैलीसाठी नम्र ठरू शकते. हा दृष्टिकोन काहींसाठी उपयुक्त ठरू शकतो वा काहींसाठी नाही, पण आहार सेवनासाठी कोणतीही जादूची गोळी नाही. आरोग्यवर्धक आहाराच्या निवडींवर लक्ष केंद्रित करा व शरीराची हालचाल किंवा चलनवलनावर आधारित आहाराचा मार्ग निवडा.

# रायगडात अनेक गावांवर दरडीची टांगती तलवार

## दहा वर्षांत दरडग्रस्त गावांची संख्या १०३वरून वाढून ३९२

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पर्यटनासाठी सेकंड होम साठी आणि येऊ घातलेले विविध प्रकल्प ही रायगड जिल्ह्याची नवीन ओळख होत आहे मात्र हा विकास करीत असताना दुसरीकडे मातीसाठी पोखरण्यात येणारे डोंगर, त्याठिकाणी करण्यात येणारी बांधकामे, यामुळे रायगड जिल्ह्यात दरड कोसळून अपघात होऊ शकणाऱ्या संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. मागील दहा वर्षात दरडीपासून धोका असलेल्या गावांची संख्या १०३ वरुन ३९२ पर्यंत वाढली आहे. पाऊस महिन्याभरावर आला आहे.

पावसाळयात दरडीपासून उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीपासून नागरिकांचे संरक्षण करता यावे यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज होत आहे. आपत्ती उद्‌भवल्यास कोणत्या उपाययोजना करण्यात यादृष्टीने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात दरडीमध्ये मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या अन्य नैसर्गिक आपत्तींपेक्षा सर्वाधिक आहे. याशिवाय दरडी कोसळून रहदारी विस्कळित होण्याच्या घटना सातत्याने घडत असतात. दरडी कोसळण्यानंतर मदतकार्य राबवण्यापेक्षा आपत्ती येण्यापूर्वी उपाययोजना केल्यास होणारे नुकसान टाळता येणे शक्य आहे. यासाठी जिल्हा प्रशासन गांभिर्याने काम करीत आहे. दरडग्रस्त गावातील नागरिकांचे निरिक्षण, त्यावर तज्ज्ञांनी मांडलेली मते यांचा सखोल अभ्यास करुन यावर उपाययोजना केल्या जात आहेत. पावसाळयात संभाव्य नैसर्गिक आपत्ती लक्षात घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेतर्फे अँक्शन प्लॅन तयार करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात यापूर्वी दरड कोसळून मोठी जिवीतहानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. २६ जुलै २००५मध्ये आलेल्या मुसळधार पावसामुळे महाड तालुक्यातील दासगाव, रोहन, जुई, कोंडिवते, अप्पर तुडील या गांवासंह पोलादपूर तालुक्यातील कुडपण, कोंढवी, कोतवाल या गावांमध्ये दरडी कोसळण्याची घटना घडली होती. यामध्ये जवळपास ३०० जणांचा मृत्यू झाला आहे. तर २२ जून २०१५ रोजी नेरळ मोहाची वाडी येथे दरड कोसळून घडलेल्या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. २१ व २२ जुलै २०२१ रोजी महाड येथे तळिये गावात दरड कोसळून ८४ जणांचा मृत्यू झाला. पोलादपूर तालुक्यातील केवनाळे येथे भूस्खलन होऊन ५ जण दगावले. तर साखर सुतारवाडी येथील दरड दुर्घटनेत ६ जणांचा जीव गेला. तीन वेगवेगळ्या दुर्घटनांत एकूण ९५ जणांचा बळी गेला. २८ जण जखमी झाले. याशिवाय आंबेमाची, हिरकणी वाडी, मोहोत, वाघेरी, सवाद, माटवण, डाभीळ येथील शेकडो कुटुंब विस्थापित झाल्याची दुर्घटना घडली होती.

### जिल्ह्यातील दरडग्रस्त गावे

रायगड जिल्ह्यात दरड कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असलेली ३९२ गावे असून, सर्वात जास्त १४० गावे पोलादपूर तालुक्यात आहेत. तर महाड १२१, रोहा २०, म्हसळा १४, माणगाव २२, पनवेल ३, खालापूर १२, कर्जत ५, सुधागड ९, श्रीवर्धन १२, तळा ३, अलिबाग ९, मुरुड ९, पेण १३ गावे दरडग्रस्त आहेत.

# पालीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट; नागरिक हैराण

**सुधागड : रामप्रहर व्रत्त**

पाली नगरपंचायत हद्दीतील हट्टाळेश्वर चौक, पाली बाजारपेठ, तहसील कार्यालय, जुने बसस्थानक, गांधी चौक यांसह अनेक ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाल्याने नागरिक हैराण झाले आहेत. दिवसाढवळ्या वाहनांच्या मागे धावत जाणे, अपघाताची शक्यता निर्माण करणे, तसेच रात्रीच्या वेळी एखाद्या व्यक्तीवर हल्ला करणे असे प्रकार वारंवार घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

शाळेत जाणारे विद्यार्थी, सकाळी फिरायला जाणारे ज्येष्ठ नागरिक आणि रात्री उशिरा घरी परतणारे कामगार यांना या मोकाट कुत्र्यांचा सर्वाधिक त्रास होत आहे.

काही वेळा कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे किरकोळ जखमा झाल्याचेही नागरिक सांगतात. त्यामुळे या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, नगरपंचायतीने कुत्र्यांचे निर्बंधन, लसीकरण आणि पुनर्वसन यासारख्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात. अशी मागणी नागरीक करीत आहेत



# अस्मिता वारे यांचा सेवापूर्ती कार्यक्रम

**तळा : प्रतिनिधी**



तळा तालुक्यातील आनंदवाडी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थाच्या माध्यमातून आनंदवाडी येथे गावचे अध्यक्ष व नगरसेवक नरेश सुर्वे यांचे अध्यक्षतेखाली नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या अस्मिता वारे यांचा सेवा पूर्ती कार्यक्रम पार पडला.

यावेळी उपसभापती रविंद्र मांडवकर, माजी उपसभापती चंद्रकांत राऊत, अनंत वारे, सुलोचना सुरेश साळवी, शंकर सारंगे, विकास पाटील, भानू मंचेकर, कमळाकर चोरगे, दिपक ठाकूर, मुबीन वासकर, गौतम मनवर, विजय येलवे, प्रमिला म्हात्रे, विजेश्री मंचेकर रमेश सकपाळ तसेच कुटुंबिय, ग्रामस्थ, महिला मंडळ , विद्यार्थी, शिक्षक आदि उपस्थित होते.

प्रथम सत्कार मुर्ती अस्मिता वारे यांना मान्यवरांचे हस्ते भेटवस्तू शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपसभापती रविंद्र मांडवकर यांनी म्हटले की अस्मिता वारे यांनी वेळेला महत्व देऊन गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले आहेत. त्याविद्यार्थी प्रिय शिक्षिका असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच चंद्रकांत राऊत यांनी म्हटले कि अस्मिता वारे यांनी आपली सेवा करतांना अनेक चांगले विद्यार्थी घडविले आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेश सुर्वे यांनीदेखील अस्मिता वारे यांच्याबद्दल म्हटल कि त्यांनी शाळेची गुणवत्ता वाढविली. तसेच मुलांना हसत खेळत ज्ञान दिले. मान्यवरांनी मनोगतातून अस्मिता वारे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# खोपोली केएमसी कॉलेजच्या प्राचार्यपदी डॉ. मकरंद वझल

**खोपोली : बातमीदार**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ के.एम.सी.काँलेजच्या प्राचार्यपदी डॉ. मकरंद वझल यांची नियुक्ती करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील यांच्या उपस्थितीत प्राचार्य डॉ.वझल यांनी मंगळवारी पदभार स्विकारला.

के.एम.सी.काँलेजच्या प्राचार्यपदासाठी पदग्रहण छोटेखानी सोहळा मंगळवार दि.२८ एप्रिल रोजी पार पडला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील, ज्येष्ठ संचालक व माजी अध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर, सदस्य राजू अभाणी, जितेंद्र रावळ, अँड.मुनिदास गायकवाड, प्रभारी प्राचार्य डॉ.प्रा.विकास सुर्यवंशी, यांच्यासह सर्व विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे स्वागत काँलेजचे अध्यक्ष दिलीप पोरवाल यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ संचालक दत्ताजीराव मसुरकर उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच नवनिर्वाचित प्राचार्य डॉ.मकरंद वझल यांनी मनोगत व्यक्त करीत भविष्यकाळात काँलेजला उभारी देण्यासाठी तसेच चांगले विद्यार्थी घडविण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले. डॉ. मकरंद वझल यांचे शिक्षण बीएससी, एम.एससी, एम.बी.ए., एम.कॉम., एम.फिल., पी.एच.डी. पर्यत आहे.





## जाहिर नोटीस

गुलमोहरपार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल, भुखंड क्र. ०६, सेक्टर १५ ऐ. सि. के. टी. शाळे समोर, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६. या गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या क्रॅक फिलॉग, वॉटरप्रूफिंग रिपेअर व लिकेज (Crack filling & Leakage) हे काम करण्यात स्वारस्य असणाऱ्या व कमीतकमी ५ (पाच) वर्षे या क्षेत्रातील तांत्रिक अर्हता व प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्ती अथवा संस्था/कंपनी यांचेकडून याकामी देकार मागविण्यात येत आहेत. सदर देकार (QUOTATION) दि. ३०/०४/२०२६ रोजी ते अंतिम तारीख दि. ०७/०५/२०२६ रोजी संध्याकाळी ७.०० (PM) वाजेपर्यंत साईट व्हीजीट केल्यावर संस्थेच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील, याकामासाठी आलेले देकार अंतिम तारीख दि. ०७/०५/२०२६ रोजी संध्याकाळी ७.३० (PM) वाजता उघडण्यात येतील व ते स्विकारण्याचे किंवा फेटाळण्याचे सर्व अधिकार हे गृहनिर्माण संस्था स्वतःकडे राखून ठेवत आहे.

**सही/- सही/-**
**अध्यक्ष सचिव**
**गुलमोहरपार्क सह.गृह. संस्था मर्या., पनवेल**
**मो. क्र.** ९८६७०६०८०८/९०२९०१८०४१


# बागायतदारांना मोठा दिलासा; माकड पकडणाऱ्यांचे मानधन दुप्पट!

## नुकसानभरपाईत सुसूत्रता येणार



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कोकणासह राज्यातील फळबागा आणि शेतीचे माकडांच्या उपद्रवामुळे होणारे नुकसान ही एक मोठी समस्या आहे. माकडांकडून होणारा हा उपद्रव रोखण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांना पकडणाऱ्या व्यक्तींना किंवा संस्थांना देण्यात येणाऱ्या मानधनात सरकारने आता दुप्पट वाढ केली आहे. यामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील बागायतदारांना मोठा दिलासा मिळणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी बागायदार संघटना आणि लोकप्रतिनिधींकडून माकडांच्या बंदोबस्तासाठी मागणी केली जात होती. याची दखल घेत सरकारने २२ एप्रिल २०२६ रोजी विशेष शासन निर्णय निर्गमित केला आहे. यानुसार, पूर्वी एका माकडाला पकडण्यासाठी दिले जाणारे ३०० रुपयांचे मानधन आता ६०० रुपये करण्यात आले आहे. या निर्णयामुळे माकड पकडणाऱ्या पथकांना प्रोत्साहन मिळणार असून मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे.

माकडांचा सर्वाधिक उच्छाद आणि उपद्रव कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात होतो. रायगड जिल्ह्यात माथेरान या पर्यटनस्थळी माकडांचा मोठा उपद्रव पर्यटकांना होतो. पर्यटकांच्या हातातील खाद्यपदार्थ ही माकडे हातोहात लंपास करतात. माथेरानमध्ये आंबे आणि जांभळाच्या झाडांवर या माकडांचा मुक्कामच असतो आणि या झाडांवरील एकही आंबा आणि जांभळे मालकांना मिळत नाहीत. या उपद्रवामुळे माथेरानमध्ये फळझाडे लावण्याच्याच फंदात कुणी पडत नाही. कर्नाळा अभयारण्यातील माकडांना गोवा महामार्गावर येण्याची सवय हौशी पर्यटक आणि वाहनचालकांनीच लावली आहे. कर्नाळा टप्प्यात गाड्या थांबवून या माकडांना केळी, बिस्किटे असे खाऊ घातले जाते. त्याची सवयच आता या माकडांना लागली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्या अर्थि मौजे तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची शेत जमिन मिळकत सदर मिळकतीचे कब्जेदार/मालक श्री. एकनाथ बामा पाटील यांचेकडुन आमचे अशिल सदर जमिन कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**-: मिळकतीचे वर्णनः-**

**मौजे तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड.**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक | हिस्सा नं. | क्षेत्रा हे.आर.पॉ. | पोट खराबा | एकूण | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ८३ | ३ | ००-२८-१० | ००-०३-०० | ००-३१-१० | ५.९४ |

त्या अर्थी सदर वरील मिळकती मध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कुळ वहीवाट, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेहि हक्क - हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस (२१) दिवसांचे आत आमच्या खालील प्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर शेत जमिन मिळकतीवरील सदरील श्री. एकनाथ बामा पाटील यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील वरील मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत व आमच्या अशिलांवर बंधंन कारक राहणार नाहीत हे सर्व जाहिर व्हावे.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २९/०४/२०२६**

**सही/-**
**अ‍ॅड. सुप्रिया पाटील- मोरे**

यशोकिरण सी एच.एस. ए.विंग ऑफिस नं ९ लोखंडीपाडा सावरकर चौक पनवेल ४१०२०६ मो. ९७६९११७३७९


# चौल येथे मोफत आरोग्य व नेत्रतपासणी शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल येथील श्री मल्लेश्वर मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य, नेत्रतपासणी व चष्मे वाटप शिबीरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. झिराड येथील दिलिपशेठ विठ्ठल भोईर चॅरिटेबल ट्रस्ट व संकल्पसिद्धी चालक-मालक मिनिडोर संघटनेच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. नवी मुंबई-खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलचे विशेष सहकार्य या शिबिराला लाभले.

मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत शिबीर पार पडले. या उपक्रमासाठी संघटनेचे अध्यक्ष तथा विद्यमान जिल्हा परिषद सदस्य दिलिपशेठ भोईर (छोटमशेठ) यांचे मार्गदर्शन लाभले. उपाध्यक्ष संतोष म्हात्रे, कार्याध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, सचिव किशोर नाईक, उपसचिव वैभव म्हात्रे, खजिनदार सुरेश पाटील, उपखजिनदार दीपक नागवेकर यांच्यासह इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

मेडिकव्हर हॉस्पिटलच्या टीमकडून कॅम्प मॅनेजर प्रतीक ठाकूर, डॉ. साक्षी ठाकूर व इतर सहकाऱ्यांनी सेवा दिली. शिबिरामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह तपासणी, मोफत ईसीजी, वजन, उंची, बीएमआय आदी तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या. या शिबिराचा लाभ २०० हून अधिक नागरिकांनी घेतला असून, ५० हून अधिक लाभार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच १८ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुढील उपचारासाठी पाठविण्यात येणार आहे.




## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-11/26-27/ Rfx No.7000039514 | Supply of various Tools and Plant at 400 kV Nagothane s/s under 400 kV Nagothane Div.... **2nd call** | **Rs. 5,29,409.38 /-** | **09.05.2026 up to 23.59hrs** |

**EMD** Rs. 1% of Estimate cost, **Tender fee** Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 **Email ID: ee7230@mahatransco.in Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**



## पनवेल महानगरपालिका
## शहर अभियंता विभाग

निविदा सूचना क्र.पमपा/जनसंपर्क/३१२६/ प्र.क्र.१२२/१३३/२०२६ दिनांक : २९/०४/२०२६

### ई-निविदा सूचना

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government/ State Government/Government Undertaking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/291/2025-26 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड. प्रभाग क्र. १७, सेक्टर - १३, नविन पनवेल मधील श्री गजानन मार्केट येथे पेवर ब्लॉक बसविणे. | २०,०५,३२५/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०४/०५/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त I**
**पनवेल महानगरपालिका**



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my clients **ANAAHAT ENTERPRISE through its Partner 1) Ms. Leena Haritsinh Gohil & 2) Mr. Mukesh Karman Arethia (having 85% share) and Mr. Ujjwal Charudatta Naik (having 15% share) has purchased** 499.84 Sq.mtrs. of plot bearing no. Plot No. 60, Sector 54, Dronagiri Node, from **M/S Dev Enterprise through** its Proprietor **Mr. Bhanaji Deva Bera,**

**SCHEDULE OF PLOT**

| Node Name | Plot No. | Sector No. | Area |
|---|---|---|---|
| Dronagiri | 60 | 54 | 499.84 Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said Plot by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of **15 days** from the date of publication hereof otherwise the transaction / sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

**Date-29.04.2026**
**Place - Panvel**

**sd/-**
**Adv. Pankaj V. Mandhare**

**UL-2/11, 702, 7th Floor, Sector 19A, Unnati, Ulwe, Panvel 410206, Mob. 9702416111, adv.pankajmandhare@gmail.com**

# मुरुडमध्ये ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीत शिवसेनेचे वर्चस्व

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील ४ ग्रामपंचायत करिता पोटनिवडणुक राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर तालुक्यातील,वेळास्ते, एकदरा,मांडला व काशिद या ठिकाणी पोटनिवडणुका घेण्यात आल्या. त्या पैकी वेळास्ते ग्रामपंचायत सर्वसाधारण स्त्री सदस्य पदाकरीता सेजल शैलेश काते व एकदरा ग्रामपंचायत प्रभाग क्रमांक २ अनु: जमाती सदानंद भिकु वाघरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने या दोन ठिकाणी निवडणूक बिनविरोध झाल्या तर ३ ग्रामपंचायत पोटनिवडणुका काल शांततेत निवडणूक पार पडल्या या निवडणूकीची मतमोजणी आज मुरूड तहसीलदार कार्यालयात नायब तहसीलदार संजय तवर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आल्या.



प्रथम एकदरा ग्रामपंचायत निवडणुकीच्या मतपेट्या उघडण्यात आल्या.एकदरा ग्रामपंचायत पदाकरीता प्रभाग क्रमांक १ मधून अनु.जमाती सदस्य पदाकरीता ४६३ मतदाते यांनी मतदान केले होते.या मतमोजणीत सदानंद भिकु वाघरे २५० मते,धर्मा नांग्या लोदी २०९ मते,तर नोटा ४ मते मिळाली या मधुन सदानंद भिकु वाघरे हे प्रभाग क्रमांक १ मधून अनु.जमाती सदस्य पदाकरीता निवडुन आल्याचे घोषित केले.प्रभाग क्रमांक २ मधुन अनु जमाती स्त्री सदस्य पदाकरीता ५०३ मतदाते यांनी मतदान केले होते. पुनम परशुराम गंबास ३३६ मते,सहारा चिंतामणी लोदी १६२ मते,नोटा– ०५ मते पडली या मधुन अनु जमाती स्त्री सदस्य पदाकरीता पुनम परशुराम गंबास निवडुन आले आहेत.

एकदरा ग्रामपंचायत प्रभाग क्रमांक ३ अनु जमाती सदस्य पदाकरीता २६४ मतदाते यांनी मतदान केले होते.या मतमोजणीत कैवल्य कमळाकांत लोदी ७८ मते शेखर नारायण वाघरे १८१ मते,नोटा ५ मते पडली असुन या मध्ये प्रभाग क्रमांक ३ अनु जमाती सदस्य पदाकरीता शेखर नारायण वाघरे हे निवडून आले आहेत.एकदरा ग्रामपंचायत प्रभाग क्रमांक ३ अनु जमाती स्त्री पदाकरीता ५२८ मतदाते यांनी मतदान केले होते.या मतमोजणीत करुणा धनंजय पाटील ८४ मते पुनम परशुराम गंबास २०१ मते सहारा चिंतामणी लोदी ८३ मते तर नोटा ८६ मते,व दुसऱ्या पेटीत नोटाला ७४ मते पडली असुन या मध्ये पुनम परशुराम गंबास हे निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले.

मांडला ग्रामपंचायत पोटनिवडणुक २०२६ प्रभाग क्रमांक १ सदस्य पदाकरीता करिता ३१३ मतदाते यांनी मतदान केले होते.या मतमोजणीतआकीब अनिस तांडेल यांना ८ मते ,निसार अगनी दळवी ८९ मते,राजेश एकनाथ पाटील १२३ मते संतोष बाळकृष्ण देऊळकर ९२ मते तर नोटाला १ मते मिळाली असुन या मधुन मांडला ग्रामपंचायत सदस्य राजेश एकनाथ पाटील हे निवडून आले. काशिद ग्रामपंचायत पोटनिवडणुक प्रभाग क्रमांक ३ मधुन ना.मा.प. पदाकरीता ३८८ मतदाते यांनी मतदान केले होते.या मतमोजणीत राकेश गणेश कासार २७४ मते,सुयोग सुर्यकांत जंगम ११४ मते, या निवडणुकीत काशिद ग्रामपंचायत सदस्य पदाकरीता राकेश गणेश कासार हे निवडून आले आहेत प्रभाग क्रमांक ३ मधुन सर्वसाधारण पदाकरीता ३८८ मतदाते यांनी मतदान केले होते.

या मतमोजणीत अतिश चंद्रकांत कासार २४५ मते,हेमंत राजेंद्र चाळके १४३ मते मिळाली या मधुन काशिद ग्रामपंचायत सदस्य पदाकरीता अतिश चंद्रकांत कासार हे निवडून आले आहेत. काशीद ग्रामपंचायत निवडणुकीची सर्व धुरा सरपंच संतोष राणे यांनी सांभाळली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे सर्व उमेदवार मोठ्या फरकाने निवडून आले आहेत. यासाठी त्यांना शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे यांनी उत्तम सहकार्य केले आहे. पोटनिवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे सर्वाधिक ग्रामपंचायत सदस्य निवडून आले आहेत.

## माणगाव तालुक्यातील वणी मलईकोंड ग्रा.पं. सदस्यपदी शिवसेनेचे इर्शादअली सरखोत विजयी

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायतींतील सदस्य,थेट सरपंच यांच्या निधन,राजीनामा,अनहर्ता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ रोजी निवडणूक घेण्यात आली. या पोटनिवडणुकांसाठी माणगाव तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. त्यामध्ये एका ग्रामपंचायतीत थेट सरपंच बिनविरोध निवडून येऊन ६ ग्रामपंचायतीत ७ सदस्य बिनविरोध निवडून येऊन एका ग्रामपंचायतीत थेट सरपंच पदासाठी एकही अर्ज न आल्याने तर ७ ग्रामपंचायतीत एकही अर्ज न आल्याने निवडणूक लागलेल्या त्या ग्रामपंचायतींचे सरपंचपद व सदस्यपद रिक्त राहिले आहे.

तर निवडणूक लागलेल्या वणीमलईकोंड ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत प्रभाग क्र.२ मधून शिवसेना शिंदे गटाचे इर्शादअली कमरुद्दीन सरखोत हे विजयी झाले. इर्शादअली सरखोत यांना १०२ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी शौकतअली अब्दुलगफूर पोटे यांना ४९ मते मिळून इर्शादअली सरखोत हे ५३ मतांनी विजयी झाल्याचे घोषित करण्यात आले. वणीमलईकोंड ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया माणगाव तहसील कार्यालयाचे निवासी नायब तहसीलदार विपुल ढुमे यांच्या अधिपत्याखाली व निवडणूक निर्णय अधिकारी माणगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बी. के .गोल्हार यांच्या उपस्थितीत पार पडली.

पळसप ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीत थेट सरपंच पदाची निवडणूक गाव पातळीवर बिनविरोध करण्यात आली असून सरपंचपदी वसंत बाबाजी कदम हे बिनविरोध निवडून आले असून अंबर्ले ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत सदस्यपदी अनिता महाबळे,दहिवली तर्फे गोवेले ग्रामपंचायतीत जहिदा दाऊद मापकर व झहिरा फैजल गालसूलकर,वडवली ग्रामपंचायतीत निशा जाधव, गांगवली ग्रामपंचायतीत समृद्धी शशिकांत मोरे,नांदवी ग्रामपंचायतीत राजेश शंकर म्हाप्रळकर,गोवेले ग्रामपंचायतीत गणेश लक्ष्मण गोविलकर हे बिनविरोध निवडून आले आहेत. तर टोळखूर्द ग्रामपंचायतीत थेट सरपंच पदासाठी तसेच सदस्य पदासाठी काकल,पहेल,हर कोल,विहूले,कुमशेत,शिरवली तर्फे निजामपूर,देगाव या ७ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसाठी एकही अर्ज न आल्याने येथील निवडणूक न झाल्याने तेथील पदे रिक्त आहेत.

## नगरसेवक प्रशांत साबळे यांचा माणुसकीचा स्पर्श करणारा पुढाकार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील खांदाड गाव परिसरात ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर आज समाधानाचे हास्य फुलवणारी एक हृदयस्पर्शी घटना घडली आहे. कार्यक्षम आणि कार्यतत्पर नगरसेवक प्रशांत साबळे यांनी मोरबा रोडवरील गोद नदीकाठी दुतर्फा सिमेंटचे बाकडे बसवून ज्येष्ठांना दिलासा देणारी मानवतावादी कृती साकारली आहे.



निसर्गरम्य गोद नदी परिसर आणि त्यालगत जाणारा पुणेमाणगावदिघी महामार्ग हा परिसर सौंदर्याने नटलेला असला, तरी येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची कोणतीही सोय नव्हती. रोज सकाळ–संध्याकाळ आरोग्यासाठी चालायला येणाऱ्या वयोवृद्धांना थकवा आल्यावर विश्रांती घेण्यासाठी जागा नव्हती. ही गरज लक्षात येताच नगरसेवक प्रशांत साबळे यांनी कोणतीही विलंब न करता स्वतःच्या खर्चातून चार सुसज्ज बाकडे उभारून ज्येष्ठांच्या आयुष्यात एक छोटासा पण मोलाचा आधार दिला.

या परिसरातून रीळे, पाचोळे, निळगूण आणि मोरबा गावांतील अनेक नागरिक दररोज ये–जा करतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी ही बाकडे म्हणजे थकलेल्या पावलांना दिलासा देणारी सावली ठरली आहेत. आता चालताना दम लागला, तर विश्रांतीसाठी एक हक्काची जागा उपलब्ध झाली आहे. ही भावना त्यांच्या मनात कृतज्ञतेची ऊब निर्माण करत आहे.

गुरू माऊली संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय शिंदे हे या उपक्रमाबद्दल आभार व्यक्त करत म्हणाले, "ज्येष्ठांची गरज ओळखून इतक्या संवेदनशीलतेने केलेले हे काम खरोखरच कौतुकास्पद आहे. प्रशांत साबळे यांनी समाजाप्रती आपली बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे." नगरसेवक प्रशांत साबळे हे नेहमीच नागरिकांच्या हाकेला तत्परतेने प्रतिसाद देणारे लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात.

ज्येष्ठांच्या थकलेल्या पावलांना आधार देत, त्यांच्या आयुष्यात थोडासा विसावा निर्माण करणारा हा उपक्रम माणगावकरांच्या मनात दीर्घकाळ लक्षात राहील.

## पोलादपूर तालुक्यातील महालगूर ग्रा.पं.सरपंचपदी शुभांगी मोरे

- तुर्भे बुद्रुक पोटनिवडणुकीत ज्ञानदेव वाडकर आणि मनिषा शिंदे विजयी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील महालगूर ग्रामपंचायतीच्या रिक्त सरपंच पदाची तसेच तुर्भे बुद्रुक ग्रामपंचायतीच्या दोन रिक्त पदांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत मंगळवारी मतदान होऊन बुधवारी मतमोजणीअंती निकाल जाहिर करण्यात आला असता महालगूर ग्रा.पं.सरपंचपदी शुभांगी मोरे विजयी झाल्या आहेत तर तुर्भे बुद्रुकच्या प्रभाग २ मधील रिक्त जागेवर ज्ञानदेव वाडकर तर प्रभाग ३ मधील रिक्त जागेवर मनिषा शिंदे या विजयी झाल्याचे तहसिलदार कपिल घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आले.

मंगळवारी महालगूर ग्रामपंचायतीच्या प्रभाग १ मधील २१५ पैकी १४२ मतदारांनी मतदान केले. प्रभाग २ मधील ८५ पैकी ६४ मतदारांनी मतदान केले तर प्रभाग ३ मधील २११ पैकी १५६ अशा एकूण ५११ पैकी ३६२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या पोटनिवडणुकीची मतमोजणी पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये होऊन शुभांगी सुभाष मोरे यांना २१२ तर त्यांच्या प्रतिस्पर्धी वनिता राजेश कदम यांना १४८ मतदान होऊन नोटा साठी २ मतदान झाले. या निवडणुकीत शुभांगी मोरे यांना निवडणूक निर्णय अधिकारी सागर जाधव यांनी ६२ मताधिक्याने विजयी घोषित केले.

पोलादपूर तालुक्यातील तुर्भे बुद्रुक प्रभाग क्रमांक २ मधील ज्ञानदेव वाडकर निवडुन आले याठिकाणी नोटाला १ मत गेले.

## एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालयाचे महाड आगाराकडे दुर्लक्ष; प्रवाशांना मनस्ताप

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावरील कोकणातील मध्यवर्ती आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाड या ऐतिहासिक शहरात असलेल्या महाराष्ट्र एस.टी. महामंडळाच्या बस स्थानकात सद्या प्रवाशांचे प्रचंड हाल होताना दिसत आहेत. महाड आगारा कडे कर्मचारी संख्या अपूर्ण असल्याने हि स्थती उद्‌भवली आहे. महाडमध्ये मंत्रिपद असताना देखील महामंडळ याकडे दुर्लक्ष करत असल्याने प्रवासी वर्गात नाराजी व्यक्त केली जात आहे.



मुंबई गोवा महामार्गावर कोकणातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून महाड कडे पहिले जाते. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या शहरात आणि जवळ असलेल्या किल्ले रायगडावर दर वर्षी लाखो पर्यटक येत असतात. शिवाय तालुक्यात मोठ्या प्रमाणात ग्रामीण भाग असल्याने ग्रामीण नागरिकांना एस.टी.शिवाय पर्याय नाही. मात्र गेली कांही वर्षात पेण ( रामवाडी ) मध्ये बसणाऱ्या एस.टी.च्या अधिकाऱ्यांनी महाड आगार बंद करण्याची सुपारी घेतली आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. कोकणातील मध्यवर्ती आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाड आगाराला मागील काही वर्षात नवीन बसेस देण्यात आलेल्या नाहीत तर चालक आणि वाहकांची कायम कमतरता तयार केली आहे. शिवाय महाड आगारातील सोयी सुविधांकडे देखील कायम दुर्लक्ष केले आहे. याठिकाणी अनेक वर्षानंतर स्वच्छता गृह बांधण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याची सुविधा देखील सामाजिक संस्थेच्या माध्यमातूनच करण्यात आली आहे. महामंडळाचे कायम स्वरूपी स्वच्छता कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर नव्याने भरती झालेली नाही. याशिवाय याठिकाणी असलेले उपहारगृह देखील अद्याप सुरु करण्यात आलेले नाही.

महाड आगारात वाहक चालकांच्या सोयीसुविधांपासून प्रवाशांच्या सोयी सुविधांचा वानवा असतानाच आता चालक, वाहक, आणि इतर कर्मचारी संख्या अशी अनेक पदे रिक्त आहेत. यामुळे लांब पल्ल्याच्या फेऱ्या आणि ग्रामीण फेऱ्यांची संख्या अधिक असली तरी चालक ,वाहकांच्या अभावी प्रवाशांना मनस्ताप होत आहे.

महाड आगारात जवळ पास ८७ कर्मचारी संख्या रिक्त आहे. अनेक फेऱ्या चालक वाहकांअभावी रद्द करण्याची वेळ महाड आगारावर आली आहे. लांब पल्ल्याच्या फेऱ्या रद्द होत असताना शेजारील माणगाव, खेड, चिपळूण, दापोली या आगारांना मात्र पुरेसा कर्मचारी वर्ग, बसेस असल्याने या आगारातून मात्र लांब पल्ल्याच्या बसेस महाड मधूनच प्रवास करत पुढे जात असल्याने येथील प्रवाशांना मात्र उभ्याने प्रवास करावा लागत आहे.

### महाड–पनवेल बसेस वाढवण्याची गरज

महाड मधून मुंबई, ठाणे, बोरीवली, नालासोपारा आदि ठिकाणी जाणारे प्रवासी यापूर्वी थेट बसने प्रवास करत होते मात्र मुंबई शहरातील वाढती वाहने, सिग्नल यामुळे एस.टी बस निर्धारित ठिकाणी पोहोचण्यासाठी अधिक वेळ लागत आहे. या त्रासातून वाचण्यासाठी प्रवासी वर्गाने पनवेल येथून रेल्वे ने जाणे पसंत केले आहे. यामुळे वेळ वाचत असून पनवेल मधून कमी खर्चात प्रवास करणे शक्य झाले आहे. मात्र पनवेल पर्यंत जाण्यासाठी महाड अगराकडून सुरु केलेल्या विना वाहक बसला वाढता प्रतिसाद पाहता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ गळचेपी करण्यास सुरवात केली आहे. महाड मधून कमी बसेस सोडून पनवेल आगाराच्या अधिक गाड्या महाड मध्ये येत आहेत. मात्र महाड मधून संध्याकाळी ६ नंतर आणि पनवेल मधून ६ नंतर विनावाहक बस सेवा नसल्याने प्रवासी हैराण होतात.

### चालक वाहकांचे नियोजन करताना आगार प्रमुखांची कसरत

महाड आगारातून नंदुरबार, धुळे, नाशिक, मुंबई, जळगाव, पुणे, औरंगाबाद, बीड, या लांब पल्ल्याच्या गाड्या धावत आहेत. तर संपूर्ण तालुक्यात गाव तिथे एस. टी. बस धावत आहे. मात्र महाड विभागीय कार्यालयाने महाड आगाराला कायम दुय्यम दर्जाची वागणूक दिली आहे. चालकांची आणि वाहकांची संख्या अपूर्ण असल्याने लांब पल्ल्याच्या गाड्या आणि ग्रामीण फेऱ्यावरील चालकांचे नियोजन करताना कसरत करावी लागत आहे.

### उत्पन्न वाढवा, पण कसे?

महारष्ट्र एस.टी. महामंडळ विभागीय कार्यालय जिल्ह्यातील आगारांना उत्पन्न वाढीचे लक्ष देते मात्र जर चालक संख्यांच पुरेशी नसेल तर उत्पन्न कसे वाढवायचे असाही प्रश्न उभा राहत आहे. मध्यंतरीच्या काळात याबाबत अनेकवेळा आवाज उठवण्यात आला मात्र महाडला मंत्रिपद असून देखील याकडे दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

## पोलादपूर तालुक्यात सुमन मोटेल्सच्या सेबी प्रतिबंधित जमिनींची पुनर्विक्री

### २०२५मध्ये परराज्यातील शेकडो खरेदीदारांना सेल डीडद्वारे सातबारा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ८८ गावांपैकी काही गावांतील जमिनींची खरेदीखतं सातबारा उताऱ्यावर न घेण्याचे पंचायत समितीच्या आमसभेत रूलिंग दिल्यानंतर 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्यात आली होती. मात्र, गेल्या वर्षाअखेरिस, परराज्यातील शेकडो खरेदीदारांना 'सेल डीड'द्वारे सातबारा नांवे करण्याची प्रक्रिया पार पडल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सेबीने सुमन मोटेल्सच्या संचालकांसह कंपनीलादेखील निर्दोष मुक्त केल्यानंतर काही जमिन माफीयांनी पुन्हा त्याच जमिनींच्या विक्रीची कागदपत्रे वारसांना अल्प मोबदला देऊन नोव्हेंबर २०२५मध्ये नोंदणी कार्यालयाकडे 'सेल डीड' दस्त नोंदवून सातबारा नांवे करण्यासाठी मोठया अर्थपूर्ण वाटाघाटी केल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यात सुमन मोटेल्सच्या हस्तक जमिनमाफीयांनी कंपनीच्या ५ हजारात १ एकर जमिनींच्या लॅण्ड स्कीममध्ये पाच हजारांमध्ये ३ ते ५ एकर जमिनी खरेदी करून त्यापैकी केवळ १ एकर जमिनी गुंतवणूकदारांना देण्याचा 'सुमन अर्थ बॉण्ड' सारखा बेकायदेशीररित्या पैसा उभारण्याचा प्रकार केला. परंतू आवश्यक नोंदणी व नियम उभारले नाहीत. यामध्ये गुंतवणूकदारांना गुंतवणूकीच्या तुलनेत जमिनी मिळाल्या नाहीत. परिणामी, या सुमन मोटेल्सकडे असलेल्या सर्व्हे नंबर नुसार सातबारा उताऱ्यांची सुची भारतीय प्रतिभूती आणि विनीमय मंडळ म्हणजेच सेबीने प्रतिबंधीत केले. कंपनी बंद करून गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याचे आदेश सुमन मोटेल्स कंपनीने पाळले नाहीत. गुंतवणूकदारांना पैसे परत करण्याचे सुमन मोटेल्सने आश्वासन दिले पण प्रत्यक्षात पैसे दिले नाहीत. गुंतवणूकदारांना १५ ते २६ महिन्यांत पैशांचा परतावा देण्यासंदर्भात सेबीला प्रस्ताव दिले. मात्र, ते अंमलात आणले नाहीत. यावेळी सेबीकडून सुमन मोटेल्स कंपनीसह कंपनीच्या चेअरमन शेख मुख्तार हुसैन, मॅनेजिंग डायरेक्टर सुरेंद्र कंधार, संचालक भारती कंधार, जावेद अख्तर, विजय एस.कुमार, अनिल कडकिया, विनोद मिस्त्री श्रीकांत चिटणीस या ९ संचालकावर २००२ सालात ५ वर्षांसाठी भांडवली बाजारातून बंदी घालण्यात आली.

यानंतर जमिनमाफीयांकडील जमिनींचे दस्त नोंदवून सातबारा उताऱ्यांमध्ये फेरफार न करण्याचे रूलींग २००० ते २००२ पर्यतच्या पोलादपूर पंचायत समितीच्या आमसभेचे आमसभाध्यक्ष तथा आमदार स्व.प्रभाकर मोरे यांनी दिले. दोन वर्षांपूर्वी १६ ऑगस्ट २०२४ रोजी विशेष न्यायालयाने सुमन मोटेल्स कंपनीसह तिच्या ९ संचालकांनाही निर्दोष मुक्त केले. यानंतर एका जमिनमाफीयाकडील दस्त पाहता जमिनीचे बाजारभाव वाढत गेल्याने या जमिनींना परराज्यातील ग्राहक आणून गुंतवणूक स्वरूपात विक्री करण्यासाठी मुंबईस्थित स्थानिक राजकीय व्यक्तीने जमिनमाफियासोबत साटेलोटे केले. त्याच्याच पक्षाच्या स्थानिक कार्यकर्तीला मोठया पदासह दस्त करण्यासंदर्भातील अधिकार केंद्राकडून मिळवून दिले.

यानंतर या दस्तनोंदणीच्या कामाला २०२५ मध्ये कमालीची गती प्राप्त झाली आहे. यासाठी उत्तरप्रदेश आणि राजस्थान येथील प्रादेशिक लिपिमध्ये मजकूर असलेले शेतकरी दाखले खरेदीदारांच्या नांवे आवश्यक कागदपत्रे म्हणून नगास नग जोडून संबंधित जमिनींच्या 'सेल डीड' दस्त नोंदवून सातबारा नांवे करण्यासाठी प्रचंड वेग प्राप्त झाला.

नोव्हेंबर २०२५ मध्ये एकाच गावातील ५५ हून अधिक एकर जमिनीची विक्री परराज्यातील खरेदीदारांना करण्यात आली. याकामी प्रशासनाला सुगावा लागताच सातबारा फेरफार मंजुरीचे अधिकार असलेल्या ब आणि क वर्गातील महसूली कर्मचाऱ्यांचे विभाग बदलण्यात आले असले तरी हे काम आजतागायत सुरू राहिल्याने प्रतिबंधीत जमिनींवर सेबीचे प्रतिबंध हटविण्यात आले होते

# पंजाबचा विजयरथ राजस्थानने रोखला!



**चंदिगड : वृत्तसंस्था**

रियान पराग याच्या नेतृत्वात अखेर राजस्थान रॉयल्स पंजाब किंग्सचा विजयरथ रोखण्यात यशस्वी ठरली आहे. आयपीएल स्पर्धेच्या १९व्या मोसमातील ३९व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्सचा सहा विकेट्सने धुव्वा उडवला. पंजाबने राजस्थानसमोर २२३ धावांचं आव्हान ठेवलं होतं. राजस्थानने हे आव्हान ४ बॉलआधी आणि ६ विकेट्स राखून पूर्ण केलं. राजस्थानने १९.२ ओव्हरमध्ये ४ विकेट्स गमावून २२८ धावा केल्या.राजस्थानने अशा प्रकारे या मोसमातील एकूण सहावा विजय मिळवला.

राजस्थानचा हा न्यू चंडीगडमधील पंजाब विरुद्धचा तिसरा विजय ठरला, तर पंजाबला या मोसमात ८व्या सामन्यानंतर पहिल्या पराभवाची चव चाखावी लागली. राजस्थानने टॉस जिंकल्यानंतर चेजिंग करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पंजाबला नाईलाजाने बॅटिंगसाठी यावं लागलं. पंजाबने २० ओव्हरमध्ये ४ विकेट्स गमावून २२२ धावांपर्यंत मजल मारली. मार्कस स्टोयनिस याने अखेरच्या क्षणी केलेल्या फटकेबाजीमुळे पंजाबला १३व्यांदा २००पेक्षा अधिक धावा करता आल्या. स्टोयनिसने पंजाबसाठी सर्वाधिक आणि नाबाद ६२ धावा केल्या.

ओपनर प्रभसिमरन सिंह याने ५९ धावांचं योगदान दिलं. कूपर कोनोली आणि कॅप्टन श्रेयस अय्यर या दोघांनी ३०-३० धावा जोडल्या, तर प्रियांश आर्या याने २९ धावांची खेळी केली. राजस्थानसाठी यश राज पुंजा याने दोघांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. तसेच जोफ्रा आर्चर आणि नांद्रे बर्गर या दोघांनी १-१ विकेट घेतली.

राजस्थानच्या विजयात एकूण ६ फलंदाजांनी योगदान दिलं. या ६ च्या ६ फलंदाजांनी दुहेरी आकडा गाठला. ओपनर यशस्वी यशस्वी जैस्वाल याने ५१ धावा केल्या. यशस्वीने २७ बॉलमध्ये १८८.८९ च्या स्ट्राईक रेटने ५१ रन्स केल्या. यशस्वीने या दरम्यान १ सिक्स आणि ७ फोर लगावले. युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने पंजाबच्या गोलंदाजांची धुलाई केली.

## संघाला आपल्या खेळाडूंवर पूर्ण विश्वास -रियान पराग



**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्सने मंगळवारी शानदार कामगिरी करत पंजाब किंग्सला सहा गडी राखून पराभूत केले. सामन्यातील विजयानंतर राजस्थानचा कर्णधार रियान परागने संघाला आपल्या खेळाडूंवर पूर्ण विश्वास आहे, असे मत मांडले.

रियान पराग म्हणाला की, एक संघ म्हणून त्यांनी स्पर्धेपूर्वी चर्चा केल्याप्रमाणे कामगिरी केली. त्यांनी प्रतिस्पर्धी संघाला थोड्या कमी धावसंख्येवर रोखायला हवे होते, पण फलंदाजांनी ती कसर भरून काढली. ते आणखी काही षटकं अधिक चांगल्या प्रकारे टाकू शकले असते आणि फलंदाजांनी काही टप्प्यांवर अधिक चांगली कामगिरी केली असती, पण संपूर्ण ४० षटकांमध्ये चांगली कामगिरी करणे हेच त्यांचे मुख्य ध्येय होते.

'काही बाह्य चिंता असल्या तरी संघाला आपल्या खेळाडूंवर पूर्ण विश्वास आहे. धावगतीमध्ये फार मागे न पडता विकेट्स वाचवणे ही त्यांची योजना होती. जैस्वाल आणि सूर्यवंशी यांनी इतर फलंदाजांसाठी गोष्टी सोप्या केल्या. तो कबूल करतो की, पॉवरप्लेनंतर ते थोडे मागे पडले, पण त्यांनी पुन्हा लय मिळवली आणि चांगली कामगिरी केली. शुभम दुबे आणि डोनोव्हन फरेरा यांची प्रशंसा करत म्हटले की, त्यांची फलंदाजी कौतुकास्पद होती.'

## मुंबईत नव्या फ्रँचायझी टी-२० लीगचे अनावरण

### स्पर्धेत भारतीय संघ मालकांचा बोलबाला



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटची पंढरी म्हणून ओळख असलेल्या मुंबईत बुधवारी आणखी एका आंतरराष्ट्रीय क्रिकेट लीगची घोषणा करण्यात आली. EUT२० Belgium ही बेल्जियममधील आयपीएलच्या धर्तीवर आधारीत पहिली व्यावसायिक स्तरावरील फ्रँचायझी ट्वेन्टी-२० क्रिकेट लीग आहे. काही महिन्यांपूर्वी दक्षिण आफ्रिकेतील अश्याच एका लीगचंही मुंबईत अनावरण करण्यात आलं होतं.

बेल्जियममधील या क्रिकेट लीगचं अधिकृत नाव 'EUT२० Belgium' असून, ही त्याची पहिली आवृत्ती आहे. येत्या ६ ते १४ जून या कालावधीत ब्रुसेल्समध्ये ही लीग खेळवली जाणार आहे. या लीगचे सर्व सामने ब्रुसेल्समधील 'स्टार्स एरिना' आणि झेम्स्ट इथं खेळवले जातील. डेस्टिनो लेजेंड्स स्पोर्ट्स आणि बेल्जियन क्रिकेट फेडरेशन यांच्या पुढाकारानं ही स्पर्धा खेळवली जात असून त्याला इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिलची (ICC) मान्यताही मिळाली आहे, हे विशेष. भारतात सोनी स्पोर्ट्सवर या स्पर्धेचं थेट प्रक्षेपण क्रिकेट चाहत्यांना पाहता येईल.

लीग टप्पा : या स्पर्धेत ५ संघ प्रत्येकी एक सामना खेळतील (एकूण १० सामने) सुपर फोर : पॉइंट्स टेबलवरील पहिले चार संघ सुपर ४ या पुढच्या टप्प्यात जातील, तिथं राऊंड रॉबिन पद्धतीनं सामने होतील. अंतिम सामना : सुपर ४ मधील अव्वल दोन संघांमध्ये १४ जून रोजी अंतिम सामना पहिल्या विजेतेपदासाठी खेळवला जाईल. स्पर्धेचा नियम : प्रत्येक संघात किमान ४ स्थानिक बेल्जियन खेळाडू असणं बंधनकारक आहे. त्यापैकी २ खेळाडू हे प्लेइंग इलेव्हनमध्येही असणं अनिवार्य.

EUT२० बेल्जियम (युरोपियन टी-२० बेल्जियम) ही बेल्जियममधील एक नवीन क्रिकेट लीग असली तरी या लीगमध्ये प्रामुख्यानं भारतीय गुंतवणूक आणि मालकी पाहायला मिळतेय. या संपूर्ण लीगची मालकी डेस्टिनो लेजेंड्स स्पोर्ट्स एलएलसी या दुबईस्थित कंपनीकडे आहे, जी रॉबिन चौधरी या भारतीय उद्योजकाच्या मालकीची आहे.

## रायगडच्या युवा खेळाडूंसाठी ब्रेबॉर्न स्टेडियमवर क्रिकेट

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई येथील सुप्रसिद्ध असलेल्या सीसीआयच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर रायगडच्या सोळा वर्षाखालील युवा खेळाडूंसाठी, आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या पुढाकाराने एकदिवसीय क्रिकेट सामन्याचे आयोजन २९ एप्रिल रोजी करण्यात आले होते.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघा विरुद्ध सीसीआय क्रिकेट अकॅडमी असा सामना रंगला. रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडूंसाठी आरडीसीएच्या वतीने जास्तीतजास्त चांगल्या दर्जाचे क्रिकेट खेळण्यासाठी संधी मिळावी यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू केले जात आहेत. गेल्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये जिल्ह्यातील विविध वयोगटातील खेळाडूंसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन जिल्ह्यातील विविध मैदानांवर आरडीसीएच्या वतीने करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यासह आता मुंबई व पुणे येथे खेळाडूंसाठी चांगल्या दर्जाचे क्रिकेट खेळण्याची संधी असोसिएशनच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली असून युवा खेळाडूंना जिल्ह्याच्या बाहेर खेळण्याचा




अनुभव मिळावा ह्या हेतूने अश्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी दिली. सीसीआयच्या कार्यकारी मंडळाने रायगडच्या खेळाडूंना सामना खेळण्याची संधी दिल्या बद्दल आरडीसीएच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

रायगड जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंना उत्तम प्रकारचे मैदान व खेळपट्टीवर यानिमित्ताने आपले कौशल्य विकसित करण्यासाठी संधी मिळाली आहे. आरडीसीए तर्फे जिल्ह्यातील विविध भागात लेदर बॉल क्रिकेटचा प्रसार व्हावा यासाठी खेळाडूंसाठी प्रीमियर लीग सारख्या स्पर्धांचेदेखील आयोजन जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून केले जात आहे.

मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर सामना खेळण्यास मिळाला त्याबद्दल खेळाडू व पालकांनी आरडीसीएचे आभार मानले आहेत. भविष्यात अशाच प्रकारचे सामनाने मुंबईसह अन्य भागात मोठ्या संख्येने आयोजित केले जातील, असे आश्वासन जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी दिले आहे.

## 'त्या' खेळाडूंचे मैदानावर येणे बंद करा -सुनील गावसकर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ हंगाम आता अर्ध्यावर पोहचला आहे. बरेच सामने अतिशय रंजकदार वळणावर येऊन संपलेले पहायला मिळाले. काही सामने ठरलेल्या वेळेत न संपता अतिरिक्त वेळत संपलेले दिसले. आता यावर माजी दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावसकर यांनी एक मोठे विधान केले आहे. या विधानाची आता जोरदार चर्चा होताना दिसत आहे.

हंगामात आतापर्यंत खेळला गेलेला सर्वात लांब सामना आरसीबी आणि मुंबई यांच्यात झाला, जो चार तास आणि २१ मिनिटे चालला, मात्र काहीवेळा संघ निर्धारित वेळेत पूर्ण २० षटके खेळू शकत



नाहीत. सुनील गावसकर यांनी बीसीसीआयला सल्ला दिला की, आपण अनेकदा पाहतो की राखीव खेळाडू फलंदाज किंवा क्षेत्ररक्षकांना पाणी देण्यासाठी सीमारेषेबाहेर उभे असतात, कारण याचा अर्थ असा होतो की सामन्यादरम्यान मैदानावर ११पेक्षा जास्त खेळाडू आहेत. रणनीतिक वेळेच्या विश्रांतीत आणि षटकांच्या मधल्या वेळेत, डगआऊटमध्ये अनेकदा अर्धा डझन लोक असतात, ज्यात अजून फलंदाजीला यायचे असलेले फलंदाजही सामील असतात.

माझ्या मते, मैदानाजवळील डगआऊटमध्ये पेय घेऊन जाणारे दोनपेक्षा जास्त खेळाडू आणि दोन राखीव खेळाडू नसावेत. गावसकर यांनी पुढे त्यांच्या आयुष्यातील एका प्रसंगाची आठवण करून दिली, ते म्हणाले, माझ्या प्रसारण कारकिर्दीच्या सुरुवातीला रिची बेनॉड यांनी मला सांगितले होते की मैदान ही एक पवित्र जागा आहे. खेळाडू आणि पंच वगळता तिथे कोणीही नसावे. मीसुद्धा खेळपट्टीचा अहवाल दिल्यानंतर क्वचितच मैदानावर जातो. आता मला आशा आहे बीसीसीआय हे सुनिश्चित करेल की 'ऑल-ॲक्सेस' मान्यता असलेले समिती सदस्य सीमारेषा ओलांडणार नाहीत. कृपया खेळाच्या मैदानाची पवित्रता जपा.

### वेग वाढवण्यासाठी सल्ला

आयपीएल सामन्यांचा वेग वाढवण्याचा एक अनोखा मार्ग समोर आला. सुनील गावसकर यांनी अखेरीस आयपीएल सामन्यांचा वेग वाढवण्यासाठी एक मौल्यवान सल्ला दिला, ते म्हणाले की टी-२० क्रिकेटमध्ये फलंदाज आधीच चांगल्या प्रकारे तयार असतात. त्यामुळे त्यांच्या क्रीजवर येण्याची वेळ दोन मिनिटांवरून एक मिनिटापर्यंत कमी केली पाहिजे. जर फलंदाज तरीही गोलंदाजाचा सामना करण्यास तयार नसेल, तर दंड म्हणून धावा जोडल्या जाऊ शकतात. यामुळे सामन्याला गती मिळू शकते.

## रियान परागचा सामन्यादरम्यान ई-सिगारेट ओढतानाचा व्हिडीओ व्हायरल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



इंडियन प्रीमियर लीगमध्ये राजस्थान रॉयल्सचा संघ सातत्याने वादात सापडताना दिसत आहे. आधी संघाच्या कोचिंग स्टाफने सामन्यांदरम्यान मोबाईल फोनचा वापर केला होता आणि आता तर संघाचा कर्णधार रियान पराग यानेच सर्व मर्यादा पार केल्या आहेत. त्यामुळे तो मोठ्या अडचणीत सापडू शकतो आणि त्याच्यावर कारवाईची टांगती तलवारही आहे.

पंजाब किंग्सविरोधात २८ एप्रिल रोजी झालेल्या सामन्यादरम्यान रियान परागचा एक फोटो समोर आला असून त्यामुळेच मोठी खळबळ माजली आहे. रियान हा संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये व्हेप (ई-सिगारेट) वापरताना कॅमेऱ्यात कैद झाला. दुसऱ्या डावाच्या १६व्या ओव्हरदरम्यान रेकॉर्ड झालेला या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आहे. सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे तो व्हेपिंग करत असताना एकटाच नव्हता, तर तेव्हा ड्रेसिंग रूममध्ये बाकीचे खेळाडूही उपस्थित होते. रियन परागच्या या कृतीमुळे केवळ त्याच्याबद्दलच प्रश्नचिन्ह निर्माण होत नाही, तर राजस्थान रॉयल्सच्या संघ व्यवस्थापनावरही बोट ठेवलं जात आहे.

रियान परागने केलेलं कृत्य हे खेळाडू आणि अधिकाऱ्यांसाठी असलेल्या आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.२चे उल्लंघन असून ते खेळाची बदनामी करण्यासारखे आहे. याबद्दल मॅच रेफरी त्याला अधिकृत ताकीद देऊ शकतात किंवा खेळाडूच्या सामना शुल्कातून काही भाग कापला जाऊ शकतो, अन्यथा निलंबनाची शिक्षाही देण्यात येऊ शकते.

सीझनच्या सुरुवातीला, संघ व्यवस्थापक रोमी भिंदर एका लाइव्ह सामन्यादरम्यान युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीसोबत डगआऊटमध्ये मोबाईल फोन वापरताना दिसले होते. हा आयपीएलच्या नियमांचा भंग होता आणि भिंदर यांना दंड ठोठावण्यात आला तसेच ताकीदही देण्यात आलेली.

## ईशान्य भारतात इनडोअर क्रिकेट अकादमींचे उद्घाटन




**गंगटोक : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवार २८ एप्रिल रोजी सिक्कीमची राजधानी गंगटोक येथून मणिपूर आणि अरुणाचल प्रदेशातील इनडोअर क्रिकेट अकादमींचं व्हर्च्युअल पद्धतीनं उद्घाटन केलं.

बीसीसीआयनं आपल्या सोशल मीडियावरुन या कार्यक्रमाचा व्हिडिओ देखील शेअर केला. बीसीसीआयच्या निधीतून चालवल्या जाणाऱ्या मणिपूर क्रिकेट असोसिएशनच्या इनडोअर क्रिकेट अकादमीचं उद्घाटन इम्फाळमधील लुवांगसांगबाम येथील लुवांगपोकपा क्रिकेट स्टेडियममध्ये करण्यात आलं. ईशान्येकडील राज्यांमधील संघटनांसाठी इनडोअर क्रिकेट अकादमी सुरू करण्याच्या उपक्रमाचा हा एक भाग आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरुणाचल प्रदेशातील डोईमुख इथं एका इनडोअर क्रिकेट अकादमीचं व्हर्च्युअल पद्धतीनं उद्घाटन केलं. ही अकादमी बीसीसीआय आणि अरुणाचल क्रिकेट असोसिएशनने संयुक्तपणे विकसित केली आहे. या प्रदेशात मुसळधार पावसाळा असूनही वर्षभर प्रशिक्षण सुनिश्चित करण्याच्या उद्देशानं, या सुविधेत आधुनिक सराव नेट्स आणि फिटनेस सेंटरचा समावेश आहे.

या आभासी कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान मोदी म्हणाले की, अशा पायाभूत सुविधांमुळं स्थानिक क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन मिळेल, तरुण खेळाडूंना प्रशिक्षणाच्या चांगल्या संधी मिळतील आणि ईशान्य भारतातील वाढत्या क्रीडा परिसंस्थेला बळकटी मिळेल.

## आयपीएल सामन्यात चेंडू लागल्याने चाहता जखमी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सच्या शिलेदारांनी पंजाब किंग्ज संघाला त्यांच्या घरामध्ये सहा विकेटने पराभूत केले. पंजाबचा या मोसमातील हा पहिलाच पराभव ठरला. या सामन्यात एका चाहत्यासोबत वाईट घटना घडली. सामन पाहण्यासाठी आलेला चाहता गंभीर जखमी झाला.

पंजाब संघ प्रथम फलंदाजीला उतरला होता. सलामीला प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग हे मैदानात उतरले होते. यामधील प्रियांश याने मारलेला षटकार स्टेडियममधील चाहत्याला लागला. चेहऱ्याला चेंडू लागल्यामुळे त्याच्या रक्त आले होते. आजूबाजूच्या इतर लोकांनी त्यांना मदत करत सावरले. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

### अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धा

## भारत पेट्रोलियम, युनियन बँक, मुंबई बंदर, युवा पलटन यांची विजयी सलामी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत पेट्रोलियम, युनियन बँक, मुंबई बंदर, युवा पलटन(इनशोअरकोट प्रा. लिमि.) यांनी बंड्या मारुती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या अखिल भारतीय पुरुष व्यवसायिक कबड्डी स्पर्धेत विजयाने शुभारंभ केला. आज झालेल्या सामान्यत महाराष्ट्रातील सामन्याचा वरचष्मा राहिला. बंड्या मारुती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

मुंबईतील ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना



येथे मॅटच्या एका क्रीडागणावर झालेल्या सामन्यात ब गटात भारत पेट्रोलियमला मुंबई पोस्टलला ४५-२५ असे पराभूत करीत साखळीत पहिला विजय नोंदविला. सुरुवात आक्रमक करीत पूर्वार्धात लोण देत पेट्रोलियमने २२-१५ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात आपला खेळ अधिक गतीमान करीत आणखी दोन लोण देत २० गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. मिलन दहिया यांने या विजयात चढाईत ११ गुण घेत महत्वाची भूमिका बजावली. त्याला चढाईत चेतन साहू व अनिल जस्ता यांने ७-७ गुण घेत,तर तुषार आढवले यांने ४ व योगेश दहिया यांने ३ पकडी करीत मोलाची साथ लाभली. पोस्टलच्या अर्जुन धंदाल यांने चढाईत ९ गुण घेत, तर यश सैगावकर यांनी ४ पकडी करीत बऱ्यापैकी लढत दिली.

तामील थलवाईसच्या गौरव यांने चढाईत ११ गुण, तर सौरभने ८ गुण घेत पूर्वार्धात चांगली लढत दिली, पण उत्तरार्धात ते ढेपाळले. युवा पलटन(इनशोअरकोट प्रा. लिमि.)ने अ गटात मिडलाईन वर ३९-३३ असा विजय मिळविला. विश्रांतीला २३-२४ अशा पिछाडीवर पडलेल्या युवा पलटनने विश्रांती नंतर कम बॅक करीत विजय साकारला. किशोर जाट, नीरज मिसळ, वैभव रबाडे यांच्या धूर्त खेळाने युवा पलटन संघाने हा विजय साकारला. मिडलाईनचा हर्ष चमकला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com